अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ८ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ११ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## आमदार विजयकुमार देशमुख यांना जीवे मारण्याची धमकी

**सोलापूर** : गेल्याच महिन्यात राज्यभर तसेच देशभरात पीएफआय या देशविघातक संघटनेच्या ठिकठिकाणच्या कार्यालयावर तसेच कार्यकर्ते राहत असलेल्या घरावर छापे मारून अनेकांची धरपकड केली. सोलापुरात सुद्धा पीएफआयच्या संघटनेच्या एका कार्यकर्त्यांची धरपकड करून त्याला अटक केली.हे प्रकरण ताजे असतानाच सोलापुरातील भाजपचे आ.विजयकुमार देशमुख यांना पीएफआयच्या कार्यकर्त्याकडून जीवे मारण्याची धमकी देणारे पत्र आले असल्याची माहिती आमदार विजय देशमुख यांनी दिली.


तसेच त्यांनी ५ ऑक्टोबर रोजी पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांची भेट घेऊन आपल्या स्तरावरून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितावर गुन्हा दाखल करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. पोलीस आयुक्तांना दिलेल्या पत्रात मोहम्मद शफी बिराजदार (रा.सहारा नगर,नई जिंदगी,मजरेवाडी सोलापूर) या इसमाने स्वतः च्या हस्तलिखित मध्ये १ ऑक्टोबर २२ रोजी पोस्टाने हे पत्र आ.विजय देशमुख यांना पाठवलेले आहे.या पत्रामध्ये पीएफआयच्या पीएफआय या संघटनेच्या कार्यकर्त्याकडून गलिच्छ भाषा वापरून शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी देण्यात आली असल्याचे म्हटले आहे.या पत्राची पोलीस आयुक्त यांनी गांभीर्याने दखल घेऊन या संदर्भात अधिक चौकशीचे आदेश दिले आहेत.

# लोन ॲपच्या नावाने दिला अनेकांना धोका, सोलापुरी पुणेकरच्या टोळीला लागला मोका

सुराज्य/सोलापूर

**लोन ॲपच्या माध्यमातून इन्स्टंट लोन देण्याचे आमिष दाखवून देशभरातील हजारो लोकांना धोका देणाऱ्या सोलापुरातील धीरज पुणेकरच्या टोळीला पुणे शहर पोलिसांनी मोका(महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा) लावला आहे. सायबर ॲक्टखाली दाखल झालेल्या गुन्ह्यात मोका अंतर्गत कारवाई महाराष्ट्रातील पहिलीच कारवाई करून पुणे पोलिसांनी सायबर गुन्हेगारांना धक्का दिला आहे. या कारवाईत अन्य तीन सोलापुरी तरुणांचाही समावेश असल्याचे पुणे पोलिसांनी सांगितले.**

सोलापुरातील धीरज भारत पुणेकर (वय ३६, रा. सोलापूर) हाच या टोळीचा प्रमुख असून त्याच्यासह स्वप्निल हनुमंत नागटिळक ( वय २९, रा. विजापूर रोड, सोलापूर) , श्रीकृष्ण भिमण्णा गायकवाड (वय २६, मूळ रा. सोलापूर, सध्या रा. त्रिवेणीनगर भेकराईनगर फुरसुंगी हडपसर), प्रमोद जेम्स रणसिंग (वय ४३, रा. मुमताजनगर कुमठेनाका, सोलापूर) या सोलापुरातील तीन तरुणांसह सॅम्युअल संपत कुमार (वय ४०, डिकोजा रोड बेलातूर बंगलोर, कर्नाटक), सय्यद अकिब पाशा ( वय २३, वर्षे रा. बेंगलोर, कर्नाटक ), मुबारक अफरोज बेग ( वय २२, रा.बेंगलोर, कर्नाटक), मुजीब बरांद कंदियल पिता इब्राहिम ( वय ४२, रा. कोझिकोड अरुर केरळ), मोहम्मद मनियत पिता मोहिदू (वय ३२, रा. पडधरा, केरळ) यांच्यावर मोकानुसार पुणे पोलिसांनी कारवाई केली आहे.



धीरज पुणेकरच्या टोळीने लोन ॲपच्या माध्यमातून उकळलेला पैसा दुबईमार्गे चीनला कसा पोहचतो? वाचा उद्याच्या अंकात



### टोळी प्रमुख धीरज पुणेकरवर बलात्कारासह अनेक गुन्हे

धीरज भारत पुणेकर याच्यावर शासकीय कंत्राटांमध्ये अपहार करत शासनाची फसवणूक करणे, परताव्याच्या किंवा जमा केलेल्या रकमेची मागणी केल्यास कुटुंबास जीवे मारण्याची धमकी देऊन बलात्कार करणे, अवैध कर्जाच्या वसुलीसाठी खंडणी मागणे, बेकायदेशीर कृत्ये करणे असे गुन्हे आहेत. त्याच्यावर पुणे आणि सोलापूरमध्ये प्रत्येकी एक बलात्काराचा गुन्हा दाखल आहे. तो सध्या हैद्राबाद येथे एका गुन्ह्यात अटक आहे.

### टोळीच्या त्रासाला कंटाळून दोघांची आत्महत्या

लोन ॲपद्वारे इन्स्टंट लोन घेतल्यानंतर अव्वाच्या सव्वा व्याज आकारणी करून ते भरण्यासाठी ही टोळी कर्जदारांना विविध प्रकारे त्रास देत होती. कर्जदाराच्या मोबाईलमधील डाटा वापरून अश्लील मेसेज तयार करून ते मोबाईल कॉन्टॅक्टमधील नंबरवर व्हायरल करण्यापर्यंत या टोळीची मजल जात होती. अशा प्रकारच्या त्रासाला कंटाळून पुण्यात दोघांनी आत्महत्या केली आहे. शिवाय याच त्रासाला वैतागून नातीने आजीचा खून केल्याचा प्रकारही घडला आहे. या प्रकरणांची दखल घेऊन पुण्याच्या सायबर पोलिसांनी या टोळीला बेड्या ठोकल्या.



### सायबर गुन्हेगारांना चाप बसेल

लोन ॲपव्दारे लोकांना त्रास देण्याचे प्रकार काही वर्षापासून सुरू होते. यामुळे दोन आत्महत्या व एक खून झाला होता. या पार्श्वभूमीवर सायबर पोलिसांनी कारवाई करून हे प्रकरण उघडकीस आणले. हे आरोपी महाराष्ट्रासह देशभरात अनेकांना फसवत असल्याचे लक्षात आले. त्यांचे धागेदोरे अन्य देशातही असल्याचे उघड झाले. या टोळीवर मोकाची कारवाई केल्याने सायबर गुन्हेगारांना चाप बसेल.

**- अमिताभ गुप्ता (पोलीस आयुक्त)**

## शहर पोलिसांच्या गाडीला अपघात; सहा पोलीस जखमी

### सोलापूर-पुणे महामार्गावर टेंभुर्णी नजीकची घटना

सुराज्य/सोलापूर

सोलापूर पुणे महामार्गावर टेंभुर्णी नजीक गुरुवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास शिराळ गावाजवळील हॉटेल जय मल्हार समोर सोलापूर शहर पोलिसांच्या बॉम्बशोधक पथकाच्या वाहनाला अपघात झालायं.आयशर टेम्पोनं (एम.एच.४३.बीपी.९५५१) पोलीस गाडीला (एम.एच.१३. सीयू.०७३३) पाठीमागून धडक दिली आणि त्यानंतर पोलीस गाडी पलटी होऊन ६ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. त्यांना कमी-अधिक प्रमाणात मुक्का मार लागला आहे.

जखमींना रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, गुरुवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील टेंभुर्णीजवळील शिराळ गावाजवळ सोलापूर शहर पोलिसांची बीडीडीएस गाडी नंबर एम.एच.१३.सीयू.०७३३ ही पुण्याहून सोलापूरकडे येत असताना पाठीमागून सोलापूरकडे येत असलेला टेम्पो एम.एच.४३ बीपी.९५५१ या गाडीने पोलिसांच्या व्हॅनला जोराची धडक दिली.धडक देणारा आयशर टेम्पो चालक हा अपघात झाल्यानंतर निघून गेला आहे.या धडकेत सहा पोलीस कर्मचारी व एक श्वान जखमी झाला आहे.या अपघातात जखमी झालेल्या पोलिसांवर टेंभुर्णी येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलीस नाईक चुंगे, पोलीस कॉन्स्टेबल रोकडे, शिंदे, सावंत, पोलीस नाईक गवळी, बांदल असे जखमी झालेल्या पोलिसांची नावे आहेत.

या अपघातानंतर टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे अधिकारी, अंमलदार यांनी तात्काळ अपघातस्थळावर पोहोचून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केल्याची माहिती पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांनी दिली.

### अपघातात 'माया' झाली जखमी

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीतील बालेवाडी येथे मुख्यमंत्री यांचा कार्यक्रम असल्याने बंदोबस्ता करिता बीडीडीएस पथकातील सरकारी वाहनात श्वान 'माया' नावाचे डॉग घेऊन गेले होते.तेथील बंदोबस्त करून परत सोलापूरकडे दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास निघाले असता रात्री सोलापूर पुणे हायवे रोडवरील शिराळ गावाच्या शिवारात हा अपघात झाला.यातील पोलीस कर्मचाऱ्यांसह श्वान 'माया' सुद्धा जखमी झाली असुन, वाहनाचे १ लाख ९० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

## शिवसेना कोणाची? फैसला पुन्हा लांबणीवर

- दोनही गटाकडून दावे-प्रतिदावे
- आज दुपारपर्यंत ठाकरे यांना अल्टिमेटम

सुराज्य/मुंबई

राज्यातील सत्ता संघर्ष टोकाला गेला आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या गटांच्या वतीने केंद्रीय निवडणूक आयोगापुढे मोठे दावे-प्रतिदावे झाले. शिंदे गट 'धनुष्यबाण' चिन्हावर दावा करु शकत नाही. त्यांनी आणि त्यांच्या समर्थक आमदारांनी स्वेछेने पक्ष सोडला असल्याची भूमिका ठाकरे यांनी मांडली तर शिवसेना आमचीची कशी खरी आहे याविषयीचे सर्व पुरावे शिंदे गटाने आयोगापुढे ठेवले. शिवसेना आणि शिंदे गटामध्ये 'धनुष्यबाण' चिन्हासाठी सुरु असलेली सुनावणी पार पडली. परंतु आयोगाने शिंदेंच्या दाव्यावर शनिवारी संध्याकाळपर्यंत उत्तर दाखल करण्यास सांगितल्याने निवाडा होऊ शकला नाही.




आयोगाने पत्राच्या माध्यमातून ठाकरे यांना ८ ऑक्टोबरला म्हणजेच शनिवारी दुपारी २ वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रांसह आपली बाजू मांडण्याचा आदेश दिला आहे. जर शिवसेनेच्या वतीने कोणतंही उत्तर आले नाही, तर याप्रकरणी योग्य तो निर्णय घेतला जाईल,अशी स्पष्ट सूचना आयोगाने ठाकरे यांना दिली.

ठाकरे गटाकडे पुरेसे समर्थन नसतानाही हा गट बेकायदेशीरपणे अंधेरी पोटनिवडणुकीत धनुष्यबाण चिन्ह वापरण्याची शक्यता असल्याने या अर्जावर तातडीने निर्णय घेण्याची विनंती शिंदे गटाने केली आहे. त्यानंतर आयोगाने ठाकरे यांना हा आदेश दिला. शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हाचा फैसला लांबणीवर पडला आहे.

## ४५ लाखांचा गुटखा जप्त पंढरपूर पोलिसांनी केली कारवाई

सुराज्य/पंढरपूर

कर्नाटक येथून औरंगाबादकडे गुटखा घेऊन जाणार ट्रक पंढरपूर येथे गुन्हे शाखेच्या अंमलदारांनी पकडला ३५ लाख रुपयांचा गुटखा आणि १० लाख रुपयांचा ट्रक असे मिळून ४५ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी दिली.

कर्नाटकमधून आलेला लाखो रुपयांचा गुटखा सांगोला मार्गाने पंढरपूर शहरातील अहिल्या पुलाजवळील रस्त्यावरून जात असल्याची माहिती सपोनी सी व्ही केंद्रे यांना मिळाली. तत्काळ त्यांनी ही माहिती उप विभागीय पोलीस अधीक्षक विक्रम कदम, पोलीस निरीक्षक अरुण पवार यांना सांगून सपोनी सी व्ही केंद्रे यांनी संबंधित ठिकाणी भेट दिली. यावेळी एम.एच ०९ सी.ए ३६३० या क्रमांकाचा ट्रक संशयितरित्या जात असताना दिसून आला. त्यास अडवून तपासणी केली असता त्यामध्ये गुटख्याची पोती मिळून आली. त्याचबरोबर ट्रक चालक प्रकाश रेवाप्पा शेजाळे ( वय २१, भीमा तेलगाव, ता. दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर) याला पोलिसांनी अटक केली आहे. अन्न औषध प्रशासन याबाबत गुन्हा दाखल करत आहे. या ट्रकमध्ये हिरा पान मसाला १२० पोती, रॉयल तंबाखू ३० पोती असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. सदरची कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग विक्रम कदम पोलीस निरीक्षक अरुण पवार पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी सपोनि सी. व्ही केंद्रे, पोसई दत्तात्रय आसबे, सपोफौ राजेश गोसावी, पोहेकॉ ढेरे, पोहेकॉ सुरज हेंबाडे, शरद कदम, पोना सचिन इंगळे, पोना सुनील बनसोडे, पोना दादा माने, पोना राकेश लोहार, पोना सचिन हेंबाडे, पोना सुजीत जाधव, पोकॉ समाधान माने यांनी केली आहे.

### अन्न औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

पंढरपूरात सर्रास गुटखा आणि माव्याची विक्री सुरू आहे. प्रत्येक पान टपरीवर गुटखा आणि मावा मिळत आहे. अन्न औषध प्रशासनाचे अधिकारी जुजबी कारवाई दाखवून अर्थपूर्ण दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन झाली आहे.




### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



खाजगी नळ घेतला तरी पाणी पूर्ण वेळ आले पाहिजे

कल्याण
560-14-789


मेन बाजार
389-06-268

## 'इंजेक्शन' देताच आरोग्य खात्याची झोप उडाली

सुराज्य/सोलापूर

**राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये प्रशासकीय कर्तव्यात कठोरपणा व शिस्त आणणारे डॅशिंग सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या नव्या फतव्यामुळे राज्याच्या आरोग्य विभागाची झोप उडाली आहे. राज्यातील सरकारच्या सर्वच आरोग्य केंद्रांमध्ये रात्रीच्यावेळी रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळाली पाहिजे, अशी तंबी मुंडे यांनी दिल्यानंतर आरोग्य अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना रात्र जागून काढावी लागत आहे.आरोग्य सेवा आणि संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियानपदाचे इनचार्ज म्हणून पदभार घेतल्यानंतर मुंडे यांनी या आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर व कर्मचारी हे रात्रीच्या वेळी हजर असायलाच हवेत, असा फतवा काढला आहे.**

महाविकास आघाडी सरकारच्या काळात मुंडे हे अडगळीत पडले होते परंतु शिंदे-फडणवीस यांचे सरकार आल्यानंतर ते पुन्हा ॲक्टिव्ह झाले आहेत. रात्रीच्या वेळेतील डॉक्टर आरोग्य केंद्रात वा रुग्णालयात हजर असलाच पाहिजे, जेणेकरून गोरगरीब रुग्णांना अखंड उपचार मिळावे या भूमिकेतून मुंडे यांनी या तपासणीचे आदेश जारी केले आहेत.त्यानुसार आरोग्य विभागाचे उपसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांपासून संपूर्ण यंत्रणा गुरुवारी मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत राज्याच्या वेगवेगळ्या भागातील ग्रामीण रुग्णालयात, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच जिल्हा रुग्णालयात जाऊन कामावरील डॉक्टर जागेवर उपस्थित आहेत का? याची तपासणी करत होते. महत्त्वाचे म्हणजे या सर्वांचे व्हिडिओ चित्रण व फोटो काढण्यास सांगण्यात आल्याने चौकशी करणारे डॉक्टरही प्रत्यक्षात जागेवर गेले होते व कोणत्या वेळी गेले तेही स्पष्ट झाले.



### हा तर रूग्णांचा हक्कच...

याबाबत मुंडे म्हणतात की- आरोग्य सेवा चोवीस तास मिळणे हा रुग्णांचा हक्क आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर जागेवर उपस्थित राहतात का? हे तपासणे गरजेचे होते. डॉक्टर जर रात्रीच्यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रात हजर असतील तरच रुग्णांना उपचार मिळणे शक्य आहे. अनेकदा शेतात काम करताना साप चावतात. विंचू दंश वा गर्भवती महिलांचे प्रश्न असतील किंवा रात्री काही दुर्घटना घडली तर संबंधित डॉक्टर हा रुग्णालयात वा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित असणे अनिवार्य आहे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र वा ज्या ठिकाणी निवासी डॉक्टर व परिचारिका उपस्थित असणे आवश्यक आहे तेथे त्यांची राहण्याच्या व्यवस्थेसह स्वच्छतागृहांची परिस्थिती काय आहे याचाही आढावा घेऊन योग्य त्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातील.

### डॉक्टरांसाठी व्यवस्था नाही

जवळपास ६० आरोग्य केंद्रांमध्ये तपासणी करण्यात आली असून यात तेरा डॉक्टर कामावर उपस्थित नसल्याचे आढळून आले असून त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार आहे. या तपासणी मोहिमेच्या पार्श्वभूमीवर काही डॉक्टरांनी दुर्गम व ग्रामीण भागातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी डॉक्टरांना राहण्याची योग्य व्यवस्था नसल्याचे सांगितले. स्वच्छतागृहांची बहुतेक ठिकाणी बोंब असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. कुठे स्वच्छता गृहाला दार नाही तर कुठे कडी नाही. काही ठिकाणी लाईटची व्यवस्था नाही तर पावसाळ्यात अनेक निवासी ठिकाणी गळती लागलेली असते. आम्ही डॉक्टर आहोत, जनावरे नाही की गोठ्यात बांधून ठेवले अशा प्रतिक्रिया काही डॉक्टरांनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर दिली.

# आयोगाचे वेसण...

भारतीय राजकारण कुठल्या थराला गेले आहे, हे पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज वाटत नाही. कारण सामान्य जनतेलाही ते कळू लागले आहे. सत्तेतून संपत्ती आणि संपत्तीतून सत्ता अशी नीती राजकीय पक्षांची झाली आहे. राजकारण्यांमध्ये शिरलेली ही कुप्रवृत्ती नष्ट होईल, अशी अपेक्षा कुणी बाळगूच नये. भले त्यांना शिस्त लावण्यासाठी कायदे केली तरीही. कायदे आहेत पण प्रभावीपणे राबवणार कोण? निवडणुकीत आचारसंहिता काय असते आणि त्याची शिस्त मोडल्यास काय अवस्था होते, हे स्व. टी. एन. शेषन यांनी आयुक्त असताना त्यांच्या काळात दाखवून दिली होती. कायद्यापुढे पुढारी कसे नमतात हे देशाने त्यावेळी पाहिलेही होते. साऱ्या देशाने शेषन यांना धन्यवाद दिले होते.कारण निवडणुकांचा प्रचार म्हणजे जणू मासळी बाजारच झालेला होता आणि सार्वजनिक ठिकाणे जणू ह्यांच्या मालकीची होऊन गेली होती. निवडणुका कुठल्याही असो, त्याच्या तोंडावर मतदारांना आमिषे दाखवण्याचे उद्योग सुरू असतात. राजकीय पक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक आश्वासने देतात. यातील बहुतांश आश्वासने तर निवडणुका झाल्यावर हवेत विरून जातात आणि एकप्रकारे मतदारांची फसवणूक होते. मात्र, आतापर्यंत मतदारांची फसवणूक केली म्हणून राजकीय पक्षांची जबाबदारी निश्चित झाली नव्हती. यातूनच दरवर्षी नवी आश्वासने देत राजकीय नेते मतदारांमध्ये संभ्रम तयार करत राहिले. मात्र, आता भारतीय निवडणूक आयोगाने प्रचारात राजकीय पक्षांकडून दिल्या जाणाऱ्या फसव्या आश्वासनांवर आळा घालण्यासाठी जे मोठे पाऊल उचलले आहे, ते निश्चितच स्वागतार्ह आहे. यासाठी आयोगाच्या आदर्श आचार संहितेत महत्त्वाचे बदल केले जाणार आहेत. हे बदल लागू झाल्यानंतर कोणत्याही राजकीय नेत्याला किंवा पक्षाला अवास्तव आणि खोटी आश्वासने देता येणार नाहीत. निवडणुकीच्या प्रचारात मतदारांना राजकीय पक्षांकडून चुकीची किंवा संभ्रम निर्माण करणारी माहिती दिली जाऊ नये आणि त्यातून दिशाभूल अथवा फसवणूक होऊ नये यासाठी निवडणूक आयोगाने काही बदल प्रस्तावित केले आहेत. यानुसार निवडणुकीत मतदारांना आश्वासन देताना दिलेले आश्वासन आर्थिकदृष्ट्या पूर्ण होणारे आहे का, त्याची अंमलबजावणी करता येणे शक्य आहे का? हे तपासले जाणार आहे. या दुरुस्तींचा प्रस्ताव तयार झाला असून त्यावर १९ ऑक्टोबरपर्यंत राजकीय पक्षांची मते, हरकती, सूचना मागवण्यात आल्या आहेत. राजकीय पक्षांकडून विरोधी पक्षांशी स्पर्धा करताना अनेक आश्वासनं दिली जातात. मात्र, ती कशी पूर्ण करणार, त्यासाठीची आर्थिक तरतूद कशी होणार याविषयी स्पष्टता नसते. याशिवाय केलेल्या आश्वासनांचा आधीच्या योजनांवर काय परिणाम होणार याचीही माहिती मतदारांना नसते. हे प्रकार टप्प्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकांमध्ये अधिक होतात. निवडणूक आयोगाने आदर्श आचार संहितेच्या भाग आठमधील निवडणूक जाहीरनाम्यांच्या नियमावलीत काही बदल प्रस्तावित केले आहेत. यानुसार, कोणत्याही राजकीय पक्षाला आपल्या जाहीरनाम्यात आश्वासन देताना ते आश्वासन पूर्ण कसे होणार, त्याची आर्थिक तरतूद कशी होणार, राज्य किंवा केंद्राची आर्थिक स्थिती पाहता ते आश्वासन पूर्ण होऊ शकतं का याविषयी माहिती द्यावी लागणार आहे. या बदलामुळे कोणत्याही राजकीय पक्षाला जर ते सत्तेत आले तर त्यांनी घोषणा केलेल्या आश्वासनांची ते पूर्तता कशी करणार, अंमलबजावणी करताना सरकारच्या तिजोरीवर किती परिणाम होणार, ती योजना पूर्ण करण्यासाठी त्याची आर्थिक तरतूद कशी करणार याची उत्तरे मतदारांना द्यावी लागतील. या आश्वासन पूर्ततेसाठी आवश्यक आर्थिक तरतूद अतिरिक्त कर लावून उभी करणार का, की आधीच्या काही योजना बंद करणार, सध्याच्या कर्जावर काय परिणाम त्याचा काय होणार, किती कर्ज वाढणार, त्याचा आर्थिक जबाबदारी आणि निधी व्यवस्थापन कायद्याने घालून दिलेल्या मर्यादांवर काय परिणाम होणार याचीही उत्तरे द्यावी लागतील. सद्यस्थितीत अनेक राजकीय पक्ष आपला निवडणूक जाहीरनामाही वेळेत आयोगासमोर सादर करत नाहीत. अशा स्थितीत हे नवे बदल लागू झाल्यास मतदारांना अधिक वास्तववादी माहिती उपलब्ध होऊन निवडणुका स्वतंत्र आणि निष्पक्ष होण्यास मदत होईल. आयोगाकडून हा लगाम आवश्यकच होता. त्यातून राजकारणी मंडळी वठणीवर येतील, अशी अपेक्षा करूयात.

---

> **नेपथ्याची चांगली जाण त्यांना होती. कट्यारचे नेपथ्य, फिरता रंगमंच, सरकता रंगमंच ह्या सगळ्या कल्पना पणशीकरांच्या होत्या. अफलातून कल्पनाशक्ती...जणू नाटक हाच ध्यास, नाटक हाच श्वास... नाटक सोडून काहीही त्यांच्या डोक्यात नसायचे. - फैय्याज शेख.**

# ...नाटक हाच श्वास

कलाविश्व



'तो मी नव्हेच' नाटकाला ६० वर्षे पूर्ण होत आहेत. मी त्यात काम केल्यामुळे या नाटकाविषयी, प्रभाकर पणशीकरांविषयी, नाट्यसंपदेविषयी मला जो अनुभव मिळाला आहे तो अभूतपर्व आहे. मी आठवीत असताना १९६१ साली सोलापूरला प्रथम पणशीकरांचे 'तो मी नव्हेच' नाटक पाहिले. प्रचंड गर्दी होती, वय लहान होते. त्यामुळे पणशीकर व्यक्तिमत्वाविषयी आश्चर्य वाटले. ही व्यक्ती अभिनय करते, गाते सुद्धा नाटकात, पटकन् वेश बदलून पुन्हा दुसरे पात्र अभिनित करते, नवीन होते.

१९६५ साली मी मुंबईत आल्यावर पहिल्यांदा वसईच्या प्रयोगात या नाटकात अत्रे साहेबांमुळे 'प्रमिला परांजपे' हे पात्र साकारले. ही भूमिका करणारी अभिनेत्री आजारी असल्याने त्या जागी २-३ वेळा काम करायला मिळाले. त्यावेळेस अत्रे थिएटरचा सगळा संच सोबत होता. पण जेंव्हा अत्रे साहेब निवर्तले तेंव्हा पणशीकर तिथले सर्वेसर्वा झाले आणि त्यांनी नाट्यसंपदेतर्फे 'तो मी नव्हेच' करायचे ठरविले.

मी सोलापूरची असल्याने कानडीवर प्रभुत्व. तेव्हा एकदा प्रयोगात चेनक्काची भूमिका साकारली आणि या पात्राचे भरपूर प्रयोग केले. जेवढ्या वेळा मी काम केलं तेवढ्या वेळा मी ते प्रचंड Enjoy केले. त्यानंतर बिर्ला थिएटरच्या sold out show ला अचानकच मला सुनंदा दातारची भूमिका करायला मिळाली. 'तो मी नव्हेच' च्या नेपथ्याचा असा एक फायदा असतो की विंगांच्या बाजूलाच पिंजरे असतात. त्यामुळे विंगांमधून prompting केले तरी काम भागण्यासारखे असते. त्यानंतर मी, सुनंदा दातारचे १००० प्रयोग केले. पणशीकरांकडून खूप खूप गोष्टी शिकायला मिळाल्या. नाटकाची संहिता जेंव्हा तुम्ही करता तेंव्हा एकतर पहिली गोष्ट तुमची चोख पाहिजे ती म्हणजे पाठांतर. इतके प्रयोग होऊन सुद्धा बसमध्ये, थिएटरमध्ये प्रवेश करण्याआधी, ग्रीन रूममध्ये सतत त्यांच्या भूमिकेचा 'संथा' रियाझ चालू असायचा. हा त्यांचा मोठा गुण होता. रोज काही ना काही नवीन नवीन शिकवायचे. ते नट तर होतेच पण फार चांगले दिग्दर्शक होते. नेपथ्याची चांगली जाण त्यांना होती. कट्यारचे नेपथ्य, फिरता रंगमंच, सरकता रंगमंच' ह्या सगळ्या कल्पना पणशीकरांच्या होत्या. अफलातून कल्पनाशक्तीजणू नाटक हाच ध्यास नाटक हाच श्वास..' नाटक सोडून काहीही त्यांच्या डोक्यात नसायचे.

दौरे कसे आखायचे हे त्यांना नेमके माहीत होते त्यांना सगळे 'दौरेबहाद्दर' म्हणायचे. त्यांचा जवळजवळ महाराष्ट्राचा संपूर्ण नकाशा पाठ होता. रस्ता चुकायचा कधी प्रश्नच उद्भवला नाही. कारण, पणशीकरांच्या डोक्यात सगळं मार्किंग पक्क असायचं. त्यामुळे आम्ही एकापाठोपाठ एक २०-२२ दौरे करु शकलो. टप्प्याटप्प्याने प्रयोग करीत करीत जवळपास संपूर्ण महाराष्ट्र दौरा पूर्ण झाला. कोल्हापूरच्या प्रयोगात प्रवेशानंतर प्रेक्षक ओरडायचे, नवीन पाखरू आलंय वाटत!!! त्यावेळी फार हसायला यायचे. पण पणशीकर कधीच bearing सोडायचे नाहीत.

मी १६ वर्षे नाट्यसंपदेत काम केलं आहे. आणि तेही जास्त करून 'तो मी नव्हेच' आणि 'अश्रूंची झाली फुले' ही नाटकं आम्ही एकत्र केली. 'अंधार माझा सोबतीचा' नाटकात माझ्यासारख्या गायक मुलीला आंधळ्या व्यक्तीचे पात्र दिले. 'वीज म्हणाली धरतीला' मध्ये 'जुलेखा' ची भूमिका दिली. पणशीकर हे 'रत्नपारखी' होते. कोणाकडून कुठले काम कसे करवून घ्यायचे हे त्यांना नीट कळायचे. त्यांनी कितीतरी कलावंत घडवले.

एकदा मीच पणशीकरांची मुलाखत घेतली, तेव्हा त्यांना मी असा प्रश्न विचारला की, 'तुम्ही जेव्हा अभिनय करता, तेव्हा निर्माता तुमच्यावर कुरघोडी करतो की निर्मात्यावर अभिनेता?' तेव्हा ते मला म्हणाले, 'जेव्हा मी ऑफ स्टेज असतो तेंव्हा मी निर्माता असतो. किती बुकिंग झाले, तिकीटे विकली गेली ही आणि अशी कामांची जबाबदारी माझ्यावर असते. पण एकदा रंग चेहऱ्याला लावला की मग तिथे निर्माता संपतो आणि अभिनेता सुरू होतो. तेंव्हा माझ्या डोक्यात फक्त नाटकाची संहिता असते.

एका प्रयोगाला दीलीप कुमार आले. त्यांना ह्याच नाटकातील लखोबा लोखंडे म्हणजेच पणशीकरांचे पात्र चित्रपटात साकारायचे होते. पण पणशीकरांचा अभिनय आणि संपूर्ण नाटक पाहिल्यावर त्यांच्या लक्षात आलं की हा विषय चित्रपटात रुपांतरीत करावयाचा नाहीच मुळी नाटकाचाच आहे. कारण सिनेमात आम्ही एका गाण्यातील तीन कडव्यात तीन ड्रेस बदलतो पण, वेश पटकन् बदलून पुन्हा लगेच मंचावर येणं ही जी मज्जा प्रत्यक्ष बघण्यात आहे ती केवळ नाटकातूनच अनुभवता येते, चित्रपटातील पूर्वनियोजित प्रवेशांमधून नव्हे, असे दिलीप कुमार म्हणाले. नाट्यसंपदेमधून त्यांनी 'होनाजी बाळा', 'जुनं नाटक संत तुकाराम', गोरा कुंभार' ही नाटकं पुनर्निर्मित केली. ह्या संस्थेमधून आम्हांला दिग्दर्शक चांगले मिळाले, आजूबाजूचे कलावंत सुद्धा तेवढेच अनुभवी मिळाले. आम्ही नाट्यसंपदेचे महोत्सव हैद्राबाद, बेंगलुरू, मंगलोर या आणि अशा अनेक ठिकाणी केले. मंगलोरला तर पणशीकरांनी कानडी भूमिका साकारली.

वसईच्या प्रयोगाला जाताना अपघात होऊन सर्वांना इजा झाली तरीही पणशीकरांपासून प्रेरणा घेऊन 'तो मी.....' चा प्रयोग केला. एवढा मोठा कलाकार पण कायम कलावंतांचे कौतुक करायचे. मनाचा मोठेपणा होता. कोणाला कधीही नावे ठेवली नाहीत. त्यांच्या ठिकाणी गुणग्राहकता होती, संस्कृत, मराठीवर प्रभुत्व होते. सगळ्यांना बरोबर घेऊन काम करणे, वाढदिवस साजरे करायचे यातून त्यांचा मनाचा मोठेपणा दिसतो. निर्माता, नेपथ्यकार, अभिनेता, संगीताची जाण असलेल्या अश्या ह्या चतुरस्त्र व्यक्तीमत्वाने 'तो मी नव्हेच' या 'न भूतो न भविष्याति' नाटकाचे १००० प्रयोग केले. जे नाटक आम्ही जगलो, ज्यातून आम्ही घडलो आणि बरंच काही शिकलो, त्याच नाटकाला आता ६० वर्षे पूर्ण होत आहेत याचा फार फार आनंद होत आहे.

**नमस्कार.**

**आचार्य अत्रे लिखित तो मी नव्हेच' नाटकाला ६० वर्षे पूर्ण होतील. ह्या आजरामर नाट्यकृतीला मानवंदना देण्यासाठी ८ ऑक्टोबर २०२२ रोजी मुंबई येथील रविंद्र नाट्य मंदिर येथे सायं. ७ वाजता, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय व नाट्यसंपदा प्रतिष्ठानच्यावतीने हीरक-महोत्सवी स्मृतिसोहळा आयोजित करण्यात येत आहे. हा कार्यक्रम सर्व रसिकांसाठी खुला आहे.**

**(लेखिका मराठी नाट्य अभिनेत्री आणि गायिका आहेत)**

**शब्दांकन : वैभवी चांदेरकर, बदलापूर.**

---

टुडेज् ब्लॉग

# लोकसंख्या वाढीचा दबाव

**लवकरच भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश बनणार असून भारताचा प्रतिस्पर्धक चीन दुसऱ्या क्रमांकावर खिसकणार आहे, अशी आकडेवारी आल्यापासून ही लोकसंख्या वाढीची चिंता अधिकच गडद होऊ लागली आहे. या संदर्भात लोकसंख्या नियंत्रणाबाबत व्यावहारिक धोरण तयार करण्याची शिफारसही करण्यात येत आहे. हे पाहता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनीही लोकसंख्या नियंत्रणाबाबत सर्वसमावेशक आणि सार्वत्रिक धोरण आखण्याची सूचना केली आहे. या दिशेने सरकार लवकरच पुढाकार घेईल, अशी अपेक्षा केली जात आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रयत्न सुरू नाहीत असे नाही. यासाठी अनेक दशकांपासून प्रयत्न सुरू आहेत.**

या प्रयत्नांचाच परिणाम म्हणजे भारतातील प्रजनन दर दोनच्या आसपास पोहोचला आहे. परंतु हे जे समस्येचे निराकरण सुरू आहे ते पुरेसे होणार नाही. यासाठी सर्व समाजाला समानतेने लागू होईल असे धोरण तयार करण्याची गरज असल्याचेही मोहन भागवत म्हणाले आहेत. प्रजनन दर सर्व समुदायांमध्ये संतुलित नसल्यास, भौगोलिक सीमा बदलण्याचा धोका असतो. तथापि, लोकसंख्या नियंत्रणासाठी व्यावहारिक आणि सर्वमान्य धोरण तयार करणे हे सोपे काम नाही.

विशेषत: भारतासारख्या विविध धर्म आणि समुदाय असलेल्या देशात, वैयक्तिक निर्णयांद्वारे ठरवलेल्या मुद्द्यांवर कायद्याद्वारे शासन करणे किंवा नियंत्रित करणे हे एक तसे धोकादायक काम आहे. याचा चांगला अनुभव इंदिरा गांधींनी घेतला आहे. त्यांच्या सरकारने लोकसंख्या नियंत्रणाबाबत कडक नियम लागू केले होते. पुरुष नसबंदीसाठी त्यांनी अक्षरशः धरपकड धोरण अवलंबले. त्यामुळे त्यांचे सरकार गेले. त्या कायद्याला देशातील सर्व समाजातून तीव्र विरोध झाला.

तो अनुभव पाहता ते धोरण पुढे नेण्याचे धाडस पुन्हा कोणत्याही सरकारने दाखवले नाही. या महत्त्वाच्या आणि संवेदनशील विषयावर सर्वांनी जनजागृती मोहिमेचीच मदत घेतली. आजही त्याचाच आधार घेतला जात आहे. काही अल्पसंख्याक समुदायांमध्ये कुटुंब नियोजन हा धर्म आणि आस्थेचा विषय आहे. त्याचा अवलंब करणे ते टाळतात. अल्पसंख्याक समुदायांमध्ये त्यांची लोकसंख्या कमी असल्याने त्यांच्यात भीतीचे वातावरण आहे, त्यामुळे ते कुटुंब नियोजनासारख्या योजनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात.



त्याचप्रमाणे, व्यवसायाशी संबंधित असलेल्या समुदायांमध्येदेखील, त्यांच्या व्यवसायासाठी वारसांबद्दल चिंता असते. आपल्यानंतर आपला व्यवसाय कोण चालवणार याची काळजी अनेकांना सतावत असते. असे असले तरी कुटुंब नियोजनाबाबत लोकांमध्ये बरीच जागरूकता निर्माण झाली आहे. त्यामुळे उत्साहवर्धक परिणामही दिसून आले आहेत. रोजगाराच्या समस्या, ध्येय गाठण्याची धडपड यामुळे विशेषतः शहरात कुटुंब नियोजनाला मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे आता सर्रास वयाच्या पंचवीस-तीसच्या पुढे जन्माला घातली जात आहेत. मुलगा असो वा मुलगी एक किंवा दोन पुरेत, अशी त्यांची धारणा झाली आहे. परंतु काही समाजांची जुनी विचारसरणी अजूनही या कुटुंब नियंत्रणाच्या आड येत आहे.

परंतु संसाधनांवर लोकसंख्येचा दबाव हे कटू वास्तव आहे आणि त्यावर मात करण्यासाठी पावले उचलावी लागणार आहेत. आता हातावर हात ठेवून चालणार नाही. लोकसंख्या अधिक असल्याचा परिणाम प्रत्येक स्तरावर दिसून येत आहेत. प्रत्येकाला योग्य पोषण मिळत नाही, ना दर्जेदार शिक्षण, ना वैद्यकीय सुविधा, आणि ना रोजगाराच्या संधी. यामुळेच भूक निर्देशांक, बेरोजगारी, निरक्षरता, आरोग्य इत्यादी बाबतीत भारत जगातील काही सर्वात खालच्या देशांसोबत उभा असल्याचे दिसून येते. हे जगातील पाचवी अर्थव्यवस्था असलेल्या देशाला शोभण्यासारखे नाही.


सर्वात गंभीर बाबा अशी की, एकीकडे अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे तर दुसरीकडे उत्पन्नातील असमानता वाढत आहे. बेरोजगारी वाढत आहे. लोकांच्या हाताला काम नाही. कोरोना काळात ज्यांच्या नोकऱ्या सुटल्या, कमी पगारावर राबवावे लागत आहे, त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झालेली नाही. साहजिकच हे नाकारता येणार नाही की, देशाची मजबूत आणि शाश्वत अर्थव्यवस्था राखण्याच्या मार्गात लोकसंख्या वाढ हाही मोठा अडथळा आहे. लोकसंख्येचा वेग थांबला नाही, तर येत्या काही वर्षांत अन्नसंकट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांची चिंता रास्त आहे. यावर विचार आणि ठोस उपाययोजना झाल्या पाहिजेत.

**- मच्छिंद्र ऐनापुरे, जत, जि. सांगली.**

---

बोधकथा

## मन आरशाप्रमाणे स्वच्छ हवे



अर्चनाला आज सकाळीच कॉलेजचे तास होते. घाईघाईनी ती स्वतःचे आवरत होती. वेणी घालायला ती आरशासमोर उभी राहिली. आरशात चेहरा स्पष्ट दिसेना तशी ती आईला म्हणाली, 'आई, आपला हा आरसा खराब आहे बघ. त्यात चेहरा स्पष्ट दिसत नाही. आईने आरसा जवळ येऊन पाहिला. म्हणाली, 'अर्चना, तसं नाही. आरसा खराब नाही त्यावर धूळ जमली आहे. ती धूळ स्वच्छ केली तर आरसा पुन्हा पूर्ववत होईल ! आईने एका फडक्याने तो आरसा पुसून स्वच्छ केला आणि आपल्या मुलीच्या हातात दिला. आरसा स्वच्छ झाल्यावर त्यात अर्चनाचा चेहरा स्पष्ट दिसायला लागला. स्वच्छ प्रतिमा पाहून तिला बरे वाटले, भराभर आवरून ती कॉलेजला निघून गेली.

**तात्पर्य - मन आरशाप्रमाणे स्वच्छ असेल तर मानसिक शांती, सुख, समाधान लाभेल.**

---

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल - १



येथे स्तुती करणारे आहेत तसेच निंदा करणारे देखील आहेत. सर्वांचे रक्षण भगवान शिव करतात. काशीत वास्तव्य करणाऱ्या जीवाला कसलेही भय नसते.

पापी माणसाला देखील काशीत मुक्ती मिळते. मन:पूत वर्तन करावे आणि काशीत येऊन मरावे म्हणजे मुक्ती मिळते, असा याचा अर्थ नाही. जे पुण्यवान असतात, त्यांना काशीत मरण आले तर ते तत्काळ मुक्त होतात. परंतु जे पापी असतात, त्यांना काशीत मृत्यू आला तर ते जीवात्मे कालभैरवाच्या ताब्यात जातात. कालभैरव त्यांना एक यातनाशरीर देऊन त्यांना त्यांच्या पापकर्मांची फळे भोगवतो आणि नंतर ते जीवात्मे शुद्ध होऊन त्यांना शिवसायुज्याची प्राप्ती होते. काशीत मृत्यू आला तर मुक्ती मिळते. तुम्ही सगळे नित्य गंगास्नान इष्टलिंगार्चन आणि सत्संग करीत आहोत. त्यामुळे तुम्ही लवकरच मुक्तीपदाचे अधिकारी व्हाल.

काल तुम्ही परकायस्थली शिवयोग्यासंबंधी काही विचार ऐकले आहेत. असा शिवयोगी आपले उर्वरित जीवन कसे जगतो आणि त्याच्यापासून इतरांना कोणती प्रेरणा मिळते विशद करणारे स्थल आहे धर्माचारस्थल.

**तस्यैव परकायस्य समाचारो य इष्यते ।**
**स धर्म: सर्वलोकानामुपकाराय कल्प्यते ।।**
**(श्रीसिद्धान्तशिखामणी - १६.५८)**

परकायस्थली शिवयोग्याचे आचरण समाजात 'धर्म' मानले जाते. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. धर्म हा पहिला पुरुषार्थ. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

जनमानस

## भारताचे सामर्थशाली वायुदल

याच दिवशी ८ ऑक्टोबर १९३२ रोजी भारतीय वायुदलाच्या स्थापना ब्रिटिशांच्या कारकिर्दीत झाली. आज भारतीय वायुदल आपला ९० वा वाढदिवस साजरा करत आहे. भारतीय वायुदल जगात पहिल्या चवथ्या क्रमांकावर आहे. या वायुदलाचे एकूण पाच विभाग आहेत. पश्चिम, पूर्व, दक्षिण, उत्तर व मध्य. भारतीय वायुदलात एकूण १,७०,००० जवान कार्यरत आहेत. भारतीय वायुसेनेचे ध्येयवाक्य पुढीलप्रमाणे आहे. **नभ:स्पृशं दीप्तम्।**
- हे वाक्य गीतेतल्या एका श्लोकात आले आहे. श्लोक असा -

**नभ:स्पृशं दीप्तमनेकवर्णं, व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।**
**दृष्ट्वा ही त्वां प्रव्यथितान्तरात्मा, धृतिं न विन्दामि शमंच विष्णो।। ...भगवद्गीता ११.२४**

हे ब्रीद वाक्य भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी सुचविले होते. भारताचे पहिले हवाई दल प्रमुख सुब्रोतो मुखर्जी हे होते. १९४७ साली विमानांना पिस्टनवर चालणारी इंजिने होती. जेट विमानांच्या आगमनानंतर ती जागा वेगवान जेट विमाननाने घेतली आहे. रडार क्षेपणास्त्रे दळणवळण यंत्रणा, नेटवर्क, सेंट्रिक वारफेअर सी-४ आय संगणक, हेवेतील हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने दूरच्या अंतरावरील टेहळणी यंत्रणा यामुळे भारतीय वायुदल सामर्थ्यशाली झाले आहे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर वायुदलाला एकूण चार पाकिस्तान व एका चीन या युद्धाशी सामना करावा लागला. द्वितीय महायुद्धातही भारतीय वायुदलाने जपानी सेनेका बर्मा सीमेवर रोकले होते. भारतीय वायुदलाच्या ताकद सुद्धा मोठी आहे. एकूण १७०० विमाने त्याच्या साठ्यात आहेत. आता प्रचंड हे विमान सुद्धा त्यांच्या मदतीला आहे.

सध्या भारतीय वायुदलाचे प्रमुख विवेक राम चौधरी हे आहेत. भारतीय हवाईदल हे सीमेचे हवाई रक्षण तर करतेच पण अनेक नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सुद्धा त्याने मदत केली आहे. त्यामध्ये गुजरातमधील १९९८चे वादळ, त्सुनामीच्या काळात २००४ साली केलेली मदत, ईशान्य भारतातील पूर मदत यांचा समावेश आहे. १ एप्रिल १९३३ या दिवशी पहिली तुकडी की, ज्यात ६ आयएफ प्रशिक्षित अधिकारी व १९ कर्मचारी होते. दरवर्षी ८ ऑक्टोबर या दिवशी भारतातील हिंडन एअर फोर्स स्टेशन गाझियाबाद, उत्तरप्रदेश येथे हवाई दल दिन साजरा केला जातो. या दिवशी आकाशात विमाने झेपावतात व नेत्रदीपक कसरती करतात. अशा या वायुदलाला शौर्याची परंपरा आहे.

**- शांताराम वाघ, पुणे.**

---

# तिकडे खोके आणि इकडे ओके

**राज्याच्या राजधानीत 'खोके' चर्चेत असताना, उपराजधानीत विकास हळूहळू 'ओके' होत चालला आहे. विकास मंडळाचे 'वैधानिक' होणे, मेट्रोला वाढीव निधी मिळणे, विकास निधी वाढणे. यातून गाडी हळूहळू मार्गावर येत आहे.**

सत्ता ही चंचल असते. सत्तेवर राहणारी मंडळी, इतरांच्या तुलनेत चार-दोन गोष्टी आपल्या भागासाठी अधिकच्या करतात. ती सामान्य प्रवृत्ती आहे. तसे करताना इतर भागाकडे दुर्लक्ष होऊ नये, याची काळजी घेणे गरजेचे आहे. दुर्लक्ष झाले की, प्रकल्पाची किंमत वाढते. तो कधीतरी पूर्ण करायचाच असतो; होणार असतो. खर्च वाढून गेला की राज्याची तिजोरी खाली होते. राज्याचे नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने नागपूरकडे आणि तिजोरी सुधीर मुनगंटीवार यांच्या रूपाने चंद्रपूरकडे असताना विदर्भात विकासकामांनी चांगलाच वेग धरला होता. अनेक संस्था आल्या. विकास प्रकल्प उभे होऊ लागले. त्यांचे सरकार गेले आणि वेग हळूहळू कमी होत गेला. त्यात कोरोनासारखा गतिरोधक होताच. त्याने सगळे ठप्प केले. दीड-दोन वर्षे एक अनामिक भीती होती. मृत्यूची दहशत होती. व्यवहार बंद होता. हे दुष्टचक्र संपणार की नाही, ही अनिश्चितताही होती. ती संपली, मात्र त्यात अनेक विकासकामे अडकली.

नागपुरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे नवे पर्व सुरू करू पाहणारी मेट्रो रेल्वेची चाके रुळावरच गाडली गेली. बांधून ठेवलेले मोठमोठे पूल, रूळ पांढरे हत्ती ठरतात की काय अशी भीती वाटू लागली. प्रकल्पाचा खर्चही कमालीचा वाढून गेला. आठ हजार ६८० कोटींचा हा प्रकल्प बघता बघता नऊ हजार २९९ कोटींचा झाला. सगळीकडे कपात धोरण सुरू असताना, या वाढीव खर्चाचे काय होणार ही चिंता सतावत होतीच. मेट्रो अर्धवट अवस्थेत फिरत होती. काही स्थानकांचे काम अर्धवट होते आणि काही मार्गांचेही. तेंव्हा राज्य मंत्रिमंडळाने या प्रकल्पाच्या वाढीव ५९९ कोटींच्या खर्चास मान्यता दिली आणि नागपूरकरांचा जीव भांड्यात पडला.

कोरोना संसर्गाचा उद्रेक होता तेव्हा राज्यच ठप्प होते, निधींची टंचाई होती आदी कारणे दिली जात होती. ही परिस्थिती आणि अशी कारणे सगळीकडेच होती. त्याचा आणि वैधानिक विकास मंडळांचा संबंध काय असावा? विदर्भ, मराठवाड्यासारख्या मागास भागांच्या विकासासाठीच या मंडळांची जाणीवपूर्वक निर्मिती करण्यात आली होती. सगळ्या राज्याचा संतुलित विकास व्हावा, हा त्यामागचा मूळ उद्देश होता. म्हणूनच राज्याचा निधी वितरित होत असताना राज्यपालांचे त्याकडे लक्ष असायचे. ही मंडळे किती महत्त्वाची आहेत, हे तत्कालीन राज्यपालांनी त्यांच्या कणखर भूमिकांतून स्पष्टही केले आहे. ही मंडळे आकारास येत असताना मात्र अनेकांचा विरोध होता, पण कार्यान्वित झालीत. पुढे वैधानिक विकास मंडळातील 'वैधानिक' हा शब्द गाळला गेला. गेली २९ महिने ही मंडळे मुदतवाढीच्या प्रतिक्षेत होती. विदर्भातील नेते मंडळी, मंत्रीमंडळी सांगून थकली मात्र ते होत नव्हते. आता या मंडळांना मुदतवाढ मिळत आहे. त्यांना पूर्वीचा वैधानिक दर्जाही बहाल केला जाणार आहे. त्यातून निधींचे संतुलित वाटप होईल आणि अनुशेषाचा प्रश्न मार्गी लागेल ही अपेक्षा. आता राज्याचीच तिजोरी फडणवीसांच्या हाती आहे. ते मदतीचा ओघ वाढवतील! नेते, पक्ष, राजकारण यामध्ये कुठल्या भागाचा विकास अडू नये. तुमचे भांडण कुठल्यातरी विचारांशी असेल, पक्षाशी असेल, नेत्यांशी असेल. सामान्य जनतेचा त्यात काय दोष? ती भरडली जाऊ नये.

-अतुल पांडे

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## पालकमंत्री विखे-पाटलांचा आ.कल्याणशेट्टी परिवाराकडून सत्कार

**सोलापूर** : राज्याचे महसूल मंत्री, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे अक्कलकोट येथील आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या कुटुंबियाकडून स्वामी समर्थ मूर्ती देऊन सत्कार करण्यात आले. मंत्री दिवसभर सोलापूर येथे शासकिय बैठका घेऊन रात्री अक्कलकोट येथे आ. कल्याणशेट्टी यांच्या कडे जेवणाचे आस्वाद घेतला. त्यावेळी प्रथमतः शांभवी कल्याणशेट्टी यांच्यासह कुटुंबातील इतर महिला भगिनींनी मंत्री विखे यांचे आरती ओवाळून स्वागत केले. त्यानंतर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी स्वामींचे मूर्ती, शाल, हार, गुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी आ. सुभाष देशमुख, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, प्रांताधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार बाळासाहेब सिरसट, बीडीओ सचिन खुडे, शहाजी पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिह गौर, पोलीस निरीक्षक प्रदीप काळे, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, उपसरपंच सागर कल्याणशेट्टी, सेवानिवृत्त शिक्षक सिद्धाराम कल्याणशेट्टी, मल्लिनाथ कल्याणशेट्टी, मनोज कल्याणशेट्टी, शांभवी कल्याणशेट्टी, सुरेखा कल्याणशेट्टी, जि प सदस्या मंगल कल्याणशेट्टी कुटुंबातील इतर सदस्य उपस्थित होते.



## लक्ष्मीकांत डंके आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानीत

**सोलापूर** : कुर्डूवाडी येथील नुतन विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक लक्ष्मीकांत रामचंद्र डंके यांना सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्यावतीने देण्यात येणाऱ्या आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार २०२२ या पुरस्काराने सन्मानींत करण्यात आले. सोलापूरच्या हुतात्मा स्मृती मंदिरात संघाच्या पुरस्कार वितरण सोहळयात शिक्षक उपसंचालक विकास गरड यांच्या हस्ते डंके यांना प्रशस्तीपत्रक आणि भेटवस्तु देवून गौरविण्यात आले. लक्ष्मीकांत डंके आणि मनिषा डंके या दांम्त्याने पुरस्काराचा स्विकार केला. जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागावे शिक्षणाधिकारी भास्कर बाबर, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी किरण लोहार, तानाजी माने, वामनराव माने यांच्यासह शिक्षण क्षेत्रामधील अनेक मान्यवर तसेच जुळे सोलापूर परिसरातील साई पॅराडाईज गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष मंगेश डंके आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. अतिशय कठीण परिस्थितीमधून शिक्षण घेत, आदर्श मुख्याध्यापक होण्यापर्यंत मजल मारलेल्या लक्ष्मीकांत डंके यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल नुतन विद्यालयाचे चेअरमन प्रभाकर चिंचवडकर, सचिव अनिल कराडे, अध्यक्षा भाटचे, उपाध्यक्षा चिंचवडकर यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, कर्मचारीवृंद तसेच पालक यांनी त्यांचे अभिनंदन केले.



## गांधी फोरमच्या प्रदेश उपाध्यक्षपदी चंद्रकांत कोंडगुळे

**सोलापूर** : राष्ट्रीय स्तरावर स्थापन केलेल्या गांधी फोरमच्या प्रदेश उपाध्यक्षपदी चंद्रकांत कोंडगुळे यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष उमेंद्र ठाकूर यांनी केली. सदरच्या नियुक्तीचे पत्र माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी गांधी फोरमचे राष्ट्रीय प्रभारी अध्यक्ष पुरूषोत्तम बलदवा यांनी माजी केंद्रीय गृहमंत्री शिंदे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी गांधी फोरमचे प्रदेश सरचिटणीस रमाकांत साळुंखे, कार्यकारिणी सदस्य जयप्रकाश पल्ली आदी उपस्थित होते.




## क्रिएटर संस्थेच्यावतीने महिला, युवतींचा सन्मान

**सोलापूर** : क्रिएटर संस्थेच्यावतीने महिला नाट्यमहोत्सवात पारितोषिक मिळाल्याबद्दल महिला आणि युवतींचा प्रमुख अतिथी सुनंदा शेंडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून हेमंत निंबर्गी उपस्थित होते. आज महिला या पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. त्यातल्या त्यात एक महिला युवती ही या संस्थेची संस्थापिका आहे. सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठीच अशा संस्थेची गरज आहे, असे प्रतिपादन शेंडगे यांनी केले. प्रास्ताविक संस्थेच्या अध्यक्षा माशाळ यांनी केले. यावेळी प्रार्थना फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद मोहिते, शक्ती कटकधोंड, प्रभाकर माशाळ, मनीषा माशाळ, अर्जुन टणके, नरसव्वा टणके आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन वैष्णवी घोडके यांनी केले तर आभार संस्थापिका श्रेया माशाळ यांनी केले.

## पद्मशाली शिक्षण संस्थेत शस्त्र पूजन

**सोलापूर** : खंडेमहानवमी निमित्त कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण विभागाच्या इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी व कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी तिन्ही विभागात प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर यांच्या हस्ते शस्त्रपूजा करण्यात आले. महाभारतामध्ये अशी आख्यायिका आहे की, पांडवांनी १ वर्ष अज्ञातवास भोगताना शमी वृक्षावर त्यांची शस्त्रास्त्रे लपवली होती.अज्ञातवास पूर्ण झाल्यावर त्यांनी खंडेनवमीच्या दिवशी शस्त्रास्त्रे काढून त्यांची पूजा केली.पुढे त्यांना युध्दात विजयश्री प्राप्त झाली. या कथेच्या संदर्भाने सर्वत्र म्हणजे पदवी,पदविका अभियांत्रिकी महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, व्यवसाय शिक्षण संस्था व तंत्रनिकेतन संस्था या सर्व ठिकाणी वर्षभर वापरण्यात येणाऱ्या हत्यारांचा सन्मान म्हणून शस्त्र पूजा करण्यात आली.

# ढगफुटी सदृश्य पावसाने माढा तालुक्यात दाणादाण

## करमाळ्यातही तुफान पाऊस, शेती पिकांचे मोठे नुकसान

**सुराज्य/माढा**

जिल्ह्यातील माढा, करमाळा तालुक्यातील अनेक गावात अचानक झालेल्या तुफान पाऊसाने शेती पिकांचे मोठे नुकसान झाले असून माढा तालुक्यातील ढवळस परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. या पावसामुळं नदी नाले दुथडी भरुन वाहत असून, अनेक ठिकाणची वाहतुक बंद करण्यात आली आहे. तसेच या पावसामुळं शेती पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. तसेच करमाळा तालुक्यातही जोरदार पाऊस झाला आहे.



माढा तालुक्यात गुरुवारी रात्री ढगफुटी सदृश पाऊस पडला असून टेंभुर्णी येथे ९० मिमी, रांजणी ८१ मिमी, रोपळे १२६ मिमी, निमगाव टे ८३ मिमी तर मोडनिंब येथे ६५ मिमी इतका नोंदवला गेला आहे. माढा तालुक्यातील पाच महसुली मंडळात शुक्रवारी रात्री ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने या मंडळातील अनेक गावांतील शेती,शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अनेक रस्ते खचले तर काही रस्ते वाहून गेल्याची माहिती मिळते आहे या पावसाने कुर्डुवाडी -टेंभुर्णी, कुर्डुवाडी -शेटफळ , पंढरपूर, तसेच माढा -कुर्डूवाडी माढा -, बार्शी या मार्गावरील बेंद ओढा ओसंडून वाहत असल्याने वाहतूक ठप्प झाली आहे.

बादलेवाडी, ढवळे, दहिवली, कंदर, शेडशिंगे, जाखले, उपळवटे, चोभेपिंपरी, भोगेवाडी, रोपळे, कन्हेरगाव, नाडी, लोणी, मुंगशी, सापटणे टे, निमगाव टे, पिंपळनेर या गावातील केळी, ऊस,पेरु, सोयाबीन या पिकांचे नुकसान झाले आहे तर या परिसरात नव्याने लागण झालेल्या उसाचे क्षेत्रात पाणी उभा राहिल्याने तेथे दुबार लागण करण्यात चे नवे संकट ओढवले आहे. करमाळा तालुक्यातील केमसह आजूबाजूच्या पाथुर्डी, मलवडी, आदी गावात अतिवृष्टी झाली आहे. केम गावाचा दहा ते पंधरा गावाशी संपर्क तुटला आहे. त्यामुळं केम गावातील जिल्हा परिषद शाळेसह हायस्कूल आणि कॉलेजला सुट्टी जाहीर केली आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. किराणा दुकानातील किराणा माल, कृषी दुकानातील खत, शेतकऱ्यांचे जनावरे वाहून गेली आहेत. केम येथील रेल्वेचा उड्डाणपूलाचे काम करावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली असून, केम पंचक्रोशीतील शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे. दरम्यान, तातडीनं पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी प्रहार संघटनेचे करमाळा तालुका अध्यक्ष संदीप तळेकर यांनी केली आहे.

### हलगर्जीपणामुळे लाखोंचे नुकसान

पंढरपूररोड वरील ओढ्यालगत कुर्डूवाडी एसटी बस आगार असून ओढ्याला पाणी आल्या नंतर बस बाहेर काढल्या नाहीत. तर तिकीट कंट्रोल मशीन रूममध्ये पाणी शिरल्यामुळे नुकसान झाले. तर एसटी बस अडकल्यामुळे अनेक फेऱ्या रद्द झाल्यामुळे झाल्या. त्याचबरोबर आगारप्रमुखांच्या घराला पाण्याने वेढा दिल्यामुळे नागरिकांनी आगार प्रमुखांना उचलून बाहेर काढले. आगार प्रमुखांच्या हलगर्जीतपणामुळे एसटी बसतील लाखो रुपयांचे नुकसान झाले.

### कुर्डूवाडी शहराचा संपर्क तुटला

कुर्डूवाडी शहरात येण्यासाठी टेंभुर्णी रोड, पंढरपूर रोड, व माढा जवळील भोसऱ्याच्या ओढ्याला पूर आल्यामुळे शहरात येणारे सर्व रस्ते बंद झाले. नैसर्गिक वाहतूक बंदी अशी परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे शाळा, महाविद्यालय व विविध शासकीय व निमशासकीय कर्मचारी आदींना सुट्ट्या घ्याव्या लागल्या.यावेळी माजी नगरसेवक बाबा गवळी,भाजपचे संजय टोणपे, हरिभाऊ बागल, सामाजिक कार्यकर्ते हरी भराटे, पिंटू वायचळ, शिवाजी चौधरी आदींनी यांनी पाणी गेलेल्या परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. कुडू हद्दीतील शेतकऱ्यांच्या गाई, म्हैस, शेळ्या वाहून गेल्याचे प्राथमिक माहिती समजत आहे.

### ढवळस-निमगाव रस्त्यावरील वाहतूक बंद


माढा तालुक्यात जोरदार पावसानं हजेरी लावली आहे. ढवळस गावात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. यामुळं रस्त्यांना नदीचे स्वरुप आलं आहे. ढवळस परिसरात सलग सहा तास जोरदार पाऊस झाला आहे. या जोरदार पावसामुळं निमगाव ढवळस रोडवरील पूल वाहून गेला आहे. रेल्वे रुळावर पाणी साचलं आहे. सर्वत्र पाणी झाल्यानं रस्ते बंद झाले आहेत. ढवळस-निमगाव रस्त्यावरील वाहतूक बंद झाली असून बेंद ओढा दुथडी भरुन वाहत आहे. पुलावरुन पाणी वाहत असल्यानं या संपूर्ण परिसराची वाहतूक बंद झाली आहे. ढवळससह पिंपरी, जाखले, भोगेवाडी या परिसरात अतिवृष्टी झाली आहे. या पावसामुळं शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. ताली, बांध फुटले आहेत. ढवळस येथील रेल्वे गेट नं ३५ इथे रेल्वे प्रशासनाने नवीन गेट खालून बोगदा करुन रस्ता केला पण या रस्त्यावर सध्या पाच ते सहा फूट पाणी आहे.

# खोक्यातील माणसे वेगळी; मी मात्र त्यातला नाही : भरणे

## ▪ मिशन कॉर्पोरेशनसाठी सज्ज रहा; विखुरलेले पुन्हा एकवटले

**सोलापूर** : खोक्यातील अन् डोंगरातील माणसे वेगळी, मी मात्र त्यातला नाही, असे सांगत जितका निधी दिला, ती सर्व कामे झाली आहेत, असे स्पष्ट करून भाजपकडून करण्यात आलेल्या टक्केवारीच्या आरोपाचे माजी पालकमंत्री तथा राष्ट्रवादीचे जिल्हा प्रभारी दत्तात्रय भरणे यांनी खंडन केले. तर आगामी शहरातील नागरी समस्यावर आवाज उठवत प्रबळ विरोधीपक्षाची भूमिका निभावत मिशन कॉर्पोरेशनसाठी सज्ज राहण्याचा सल्ला दिला.

शुक्रवारी शासकीय विश्रामगृहात भरणे यांनी आगामी सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक घेतली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. भरणे हे यापूर्वी महाविकास आघाडी सरकारच्या काळात सोलापूरचे पालकमंत्री असताना टक्केवारी घेऊन कामे दिल्याचा आरोप भाजपने केला होता. याबाबत विचारले असता त्यांनी या आरोपाचे खंडन करत खोके, टक्केवारी आणि डोंगरावरची माणसे सर्व काही वेगळी आहेत. मी दिलेला निधी आणि झालेली कामे जगजाहीर आहेत. त्यामुळे विरोधकांच्या आरोपांना मी फारसे महत्त्व देत नाही, असे त्यांनी सांगितले.



दरम्यान, बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना प्रत्येकाच्या घरोघरी जाऊन झोपडपट्टीत फिरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रत्येकाच्या मनात रुजवण्याच्या सूचना भरणे यांनी केल्या. पक्ष संघटना वाढविण्यासाठी प्रत्येकांनी झटा शहरातील रस्ते, खड्डे, पाणी पुरवठ्याच्या समस्या घेऊन आंदोलनाच्या माध्यमातून आवाज उठवा प्रबळ विरोधीपक्षाची भूमिका निभावत मिशन कॉर्पोरेशनसाठी सज्ज राहण्याचा कानमंत्र भरणे यांनी यावेळी बैठकीत दिला.

या बैठकीला पक्षाचे निरीक्षक शेखर माने, शहराध्यक्ष भारत जाधव, प्रदेश सचिव संतोष पवार, महेश कोठे, ॲड.यू.एन.बेरिया, नलिनी चंदेले, ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, माजी शहराध्यक्ष महेश गादेकर, प्रदेश सचिव शफी इनामदार, शंकर पाटील, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, प्रदेश महिला काँग्रेसच्या विद्या लोलगे, माजी नगरसेवक तौफिक शेख, महिला आघाडीच्या अध्यक्षा सुनीता रोटे, लता फुटाणे, बिस्मिल्ला शिकलगार उपस्थित होते.

### दिवाळीपूर्वी अजित पवारांचा सोलापूर दौरा

कोठे, चंदनशिवे यांच्यासह आता सर्व एकत्र आले आहेत. सर्व राष्ट्रवादीमध्ये आहेत. आता विरोधीपक्षनेते अजित पवार सोलापूर शहरात लक्ष घालणार आहे. दिवाळी पूर्वी सोलापूर दौऱ्यांवर येणार आहेत. त्यांच्या दौऱ्यांचे नियोजन करा, बैठका, जाहीर सभा,मेळावे घ्या अशा सूचना भरणे यांनी केल्या. अजित पवार यांच्या दौऱ्यांच्या वेळी रखडलेले प्रवेश होण्याची शक्यता देखील त्यांनी यावेळी बोलून दाखवली.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत खुर्चीवरून सुरूवातीलाच मानापनाचा कलगीतुरा रंगला होता. पक्षाचे माजी शहराध्यक्ष महेश गादेकर हे मागील रांगेतील खुर्चीवर बसले होते. तसेच ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल यांनाही बसायला खुर्ची नव्हती. तेसुद्धा पाठीमागे बसले. त्यावेळी माजी महापौर महेश कोठे आणि ॲड.यू.एन. बेरिया यांनी दोघांमध्ये जागा करून खरटमल यांच्यासाठी खुर्चीची सोय केली. दरम्यान, गादेकर मागे बसल्याचे दिसताच भरणे यांनी महिलांना उठायला सांगितले आणि तीन खुर्च्या बसण्यासाठी रिकाम्या केल्या. एका खुर्चीवर महेश गादेकर बसले, दुसऱ्या दोन खुर्च्या तौफिक शेख व अन्य एका पदाधिकाऱ्याला बसण्यासाठी दिल्या.

## बार्शीत विजयादशमी उत्सवानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने पथसंचलन

**बार्शी** : विजयादशमी उत्सवानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बार्शी शाखेच्यावतीने आज बुधवार दि. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता शहरातील भगवंत मैदान येथून पथ संचलनास सुरुवात होऊन फुलवाले चौक, वीर सावरकर चौक, पटेल चौक, दाणे गल्ली, पान खुंट, किराणा रोड, पांडे चौक, नगरपालिका ते भगवंत मंदीर आदी भागातून स्वयंसेवकांचे पथक संचलन काढण्यात आले.

ठिकठिकाणी संघ स्वयंसेवकांवर पुष्पवृष्टी करुन नागरिकांनी उत्साहात स्वागत केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने दरवर्षी विजयादशमीला पथसंचलन काढण्यात येते. यंदाच्या पथसंचालनामध्ये स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. सुरुवातीस भगवंत मैदान या ठिकाणी संघ गीत व भगव्या ध्वजाला प्रणाम करुन पथसंचलनाला सुरुवात करण्यात झाली. या पथसंचलनात जिल्हा संघचालक सुनिलजी इंगळे, तालुका संचालक आनंद सोमाणी, तालुका कार्यवाह रवींद्र यादव, सहकार्यवाह तुषार महाजन, मोहन श्रीरामे, उमेश ठोंबरे, सुनिल गोलकोंडा, अतिश भिसेन, दिनकर सापनाईकर, उपखंड प्रमुख विशाल बुडूख, सहप्रमुख निलेश घाटे, तालुका कार्यकर्ते, उपखंड कार्यकर्ते, ज्येष्ठ स्वयंसेवक आदी सहभागी झाले होते.

## सावंत प्रतिष्ठानच्यावतीने सोनारी येथे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा

**सुराज्य/माढा**

जयवंतराव सावंत प्रतिष्ठानच्यावतीने रविवार दि.११ डिसेंबर २०२२ रोजी सोनारी (ता.परंडा) येथे मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन केले असून नावनोंदणी सुरू असल्याचे शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा भैरवनाथ शुगरचे चेअरमन प्रा शिवाजीराव सावंत यांनी सांगितले.



गेली वीस वर्षापासून जयवंतराव सावंत प्रतिष्ठानच्या वतीने कोरोनासंकटकाळातील दोन वर्षाचा अपवाद वगळता दरवर्षी सर्वधर्मीय सामुदायिक मोफत विवाह सोहळयाचे आयोजन केले जाते. संपूर्ण राज्याने आदर्श घ्यावा असा भव्य दिव्य विवाहसोहळा आयोजित करताना सर्वतोपरी व्यवस्था करण्यात सावंत परिवार कुठलीही कमतरता ठेवत नाहीत. यामुळे या विवाहसोहळयात मोठ्या संख्येने विवाह होत आले आहेत.

प्रा शिवाजीराव सावंत यांनी चालूवर्षी राज्याचे आरोग्यमंत्री प्रा तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन केले जात असल्याचे सांगून विवाह सोहळ्यासाठी वधू वरांची नावनोंदणी भैरवनाथ शुगरचे सोनारी, विहाळ, लवंगी, आलेगाव, वाशी या सर्व कारखान्यांच्या कार्यालयांसह जयवंत मल्टीस्टेच्या सर्व शाखांमध्ये सुरू असल्याचे सांगितले. सोहळयात विवाह करण्यासाठी नावनोंदणी करताना वधू वरांच्या वयाचे पुरावे देणे आवश्यक आहे.

नोंदणीसाठी कोणतीही फी आकारण्यात येणार नाही. वधू वरांना विवाहासाठी शालू, सफारी, मुलींसाठी मनीमंगळसुत्र व संसार उपयोगी भांडी मोफत देण्यात येणार आहेत. सोहळयासाठी वऱ्हाडी किती आणावे याचे बंधन नाही. सर्व वऱ्हाडींसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. तर सोहळयात येणार्या वाहनांसाठी पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार असल्याचे प्रा सावंत यांनी सांगितले.

यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत, जिल्हा परिषद सदस्य धनंजय सावंत, ॲड केशव सावंत, कार्यकारी संचालक पृथ्वीराज सावंत, सरपंच ऋतूराज सावंत, संजय ढेरे, नाना शेलार उपस्थित होते.

## स्टेनोग्राफर असोसिएशनच्या अध्यक्षपदी राहुल कुलकर्णी

### ▪ शंकर कांबळे सचिव तर महादेव फुलसरे उपाध्यक्ष

**सुराज्य/सोलापूर**

राज्य सरकारी मोफुसिल स्टेनोग्राफर असोसिएशनची सोलापूर जिल्हा कार्यकारिणी तयार करण्यात आली असून अध्यक्षपदी राहुल कुलकर्णी तर सचिवपदी शंकर कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील लघुलेखकांची बैठक शासकिय विश्रामगृह येथे २ ऑक्टोबर रोजी पार पडली. बैठकीत राज्यस्तरीय संघटनेच्या मान्यतेने जिल्हा कार्यकारिणी निवडी करण्यात आल्या. महापालिका आयुक्तांचे स्वीय सहायक राहुल कुलकर्णी यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी अपर जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहायक महादेव फुलसरे, सचिवपदी जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक शंकर कांबळे, सहसचिव म्हणून अनुराधा मुळे-नागटिळक, कोषाध्यक्ष राघवेंद्र भंडारे, सहकोषाध्यक्ष म्हणून गजानन खटके यांची एकमताने निवड करण्यात आली. सदस्य म्हणून प्रदीप शिंदे, संगप्पा कोणदे, अमोल सोनवणे, महेश कोटाणे, अमोल भुरे, विशाल पवार, सिद्धनाथ जाधव, माधवी पारेकर आणि श्रीमती पतंगे. बैठकीमध्ये लघुलेखक संवर्गाच्या विविध समस्या, अडचणीबाबत चर्चा झाली. रिक्त पदे, वेतनश्रेणी लक्षात घेऊन राजपत्रित अधिकारी दर्जा, समकक्ष पदावर पदोन्नती देणे, पदनामात बदल, वेतनश्रेणीमध्ये सुधारणा, विभागीय परीक्षा, बदली धोरण याबाबत चर्चा करण्यात आली.

# जिल्ह्यातील ५ लाख शिधापत्रिका धारकांना मिळणार दिवाळी किट

## ▪ कार्डसंख्येनुसार किटची नोंदणी, लाभार्थी विचारतात किट आले का?

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर जिल्हातील पाच लाख शिधाधारकांची यंदाची दिवाळी गोड होणार आहे. राज्य शासनाने दिवाळीसाठी जाहीर केलेल्या शंभर रुपयाच्या किट या लाभार्थ्यांना मिळणार आहे. फक्त शंभर रूपयात तेल, चना दाळ, साखरचे किट वाटपाचे नियोजन जिल्हापुरवठा विभाग आणि शहर अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. तर गोर गरिब आता पासून रेशन दुकानदारांना आमचे किट आले का अशी विचारणा करत आहेत तर प्रशासनाच्या वतीने कार्ड संख्येनुसार शासनाकडे किटची मागणी केली आहे.

कोरोनाच्या पाश्‍र्वभुमिवर गेली दोन वर्षे गरिबांना दिवाळी साजरी करता आली नाही यंदा निर्बंध मुक्त उत्सव आणि सण साजरे केले जात असल्याने जनेते मध्ये जोष आहे. या शिंदे - फडणवीस सरकराने गोर गरिब जनतेला गोड बातमी देत दिवाळी गोड केली आहे. यंदाच्या दिवाळीला राज्य सरकारच्या वतीने रेशन दुकानदारांच्या माध्यमातून शिधा धारकांना शंभर रूपयात धान्याचे टिक देण्याची घोषणा केली आहे. त्यांची दिवाळी पुर्वी अमंलबजावणी केली जाणार आहे.


पण यंदा कोरोनाची साथ आटोक्यात आल्याने दिवाळीत कसलेच बंधन राहणार नाही. त्याम के ही दिवाळी गवाही अनंदाने साजरी करता यावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उप मुख्यमंत्री देवेंद्र




फडणवीस सरकारने राज्यातील गरीब जनतेला दिवाळी गोड व्हावी म्हणून दिवाळीची भेट दिली आहे. किराणा दुकानामध्ये अंदाजे साडे तीनशे रुपयांना मिळणारा किराणा मात्र स्वस्त धान्य दुकानामध्ये केवळ शंभर रुपयामध्ये मिळणार आहे. केंद्र शासनामार्फत मोफत धान्याचे वितरण प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना या योजनेअंतर्गत डिसेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ दिली आहे .आता राज्य शासनाने घेतलेल्या वेगळ्या निर्णयामुळे यंदाच्या दिवाळीत दुग्ध शर्करा योग साधला आहे त्यामुळे यंदाची गरीबांची दिवाळी धुमधडाक्यात आनंदाने साजरी होणार आहे. दिवाळी गोड करण्यासाठी शंभर रुपयाचे किट मध्ये गोडेतेलाचे एक किलोचे पाकिट, एक किलो चनाडाळ व एक किलो साखर, एक किलो रवा अशा पाच वस्तू दिल्या जाणार आहेत. या बाबतचे आदेश जिल्हा पुरवठा विभागाला प्राप्त झालेले आहेत अशी माहिती विभागाचे पुरवठा उप आयुक्त डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी दिली. दिवाळी पूर्वी या पॅकेजचे वाटप करावयाचे असल्याने पूणे पुरवठा विभागाचे उपआयुक्त डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी विभगामधील सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी यांची बैठक घेवून सुचना दिलेल्या आहेत. आधीच स्टाफची कमतरता रेग्युलर धान्य, मोफत धान्य व आता दिवाळीसाठी पॅकेजचे वाटप यामुळे पुरवठा यंत्रणेवर ताण आलेला असून पुरवठा यंत्रणा गोरगरीबांची दिवाळी आनंदाने साजरी व्हावी यासाठी झपाटयाने कामाला लागली आहे.

दरमहा मिळणारे नियमीत धान्य, प्रधानमंत्री गरीब अन्न योजनेअंतर्गत मिळणारे मोफत धान्य दिवाळी किट वाटप केले जाणार आहे. त्यासाठी पुणे विभगातील पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्हयांच्या जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी आवश्यक शिधाधारकांची माहितीसह किटची मागणी महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटीव्ह कंझ्युमर्स फेडरेशन लिमिटेड कंत्राटदार यांचेकडे नोंदवली आहे. तालुक्याच्या गोदामापर्यत संच पोहचविण्याची जबाबदारी कंत्राटदार पोच करणार आहे.

**पुणे विभागात २८ लाख लाभार्थी** : पुणे (९१५६६२), सातारा (३८०८०८), सांगली (९१२६७६), सोलापूर (५११९७५), कोल्हापुर (५५०३६७)



## राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाकडून पालकमंत्र्यांकडून निवेदन

सुराज्य/सोलापूर : राज्यातील पोलीस पाटील यांच्या विविध मागणीचे निवेदन राज्याचे महसूल व सोलापूर जिल्ह्याचे नूतन पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाकडून निवेदन देण्यात आले.

निवेदन अक्कलकोट येथील आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या निवासस्थानी आले असता त्यावेळी देण्यात आले.

त्या निवेदनात असे म्हटले आहे की, वाढती महागाई लक्षात घेता पोलीस पाटील यांचे मानधन दरमहा १५०००/- रुपये करावे, पोलीस पाटील यांचे निवृत्ती वय ६० वरून ६५ वर्षे करावे, जबाबदारी लक्षात घेता त्यांना काही अधिकारात वाढ करण्यात यावी. पोलीस पाटील यांचे नूतनीकरण कायमचे बंद करावे. पोलीस पाटील कायद्यात दुरुस्ती करून त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे, पोलीस पाटील यांना आरोग्य सेवा व विमा सुरक्षा देण्यात यावी, पोलीस पाटील यांना पेन्शन लागू करावे, पोलीस पाटील यांना आवश्यकतेनुसार शस्त्र परवाना देण्यात यावा, पोलीस पाटील यांच्याकडे दुसऱ्या गावाचा अतिरिक्त चार्ज असतो, तेव्हा त्यांना अतिरिक्त मानधन देण्यात यावे, या मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी माजी सहकार मंत्री आ. सुभाष देशमुख, आ. सचिन दादा कल्याणशेट्टी, शहाजी पवार, सुरेखा होळळीकट्टी, महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष शिवानंद फुलारी, अक्कलकोट शाखेचे तालुका सचिव उमेश देडे, प्रसिद्धी प्रमुख महादेव बिराजदार, चप्पळगाव विभाग प्रमुख चिदानंद हिरेमठ, जेऊर विभाग प्रमुख कल्याणी गायकवाड, सलगर विभाग प्रमुख सुशांत बिराजदार, आदीजण उपस्थित होते.

## निधन वार्ता

### मुरलीधर धांडोरे



सुराज्य/अकलूज : माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथील मुरलीधर महिपती धांडोरे यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सूना, नातू असा परिवार आहे.

### शोभादेवी कदम-पाटील



सुराज्य/अकलूज : जागृती महिला शिक्षण व सामाजिक प्रतिष्ठान केगाव ता. उत्तर सोलापूरच्या अध्यक्षा तथा माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथील शोभादेवी काकासो कदम पाटील यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले असा परिवार आहे.

### अशोक शिंदे



सुराज्य/श्रीपूर : माळखांबी ता. माळशिरस येथील येथील रहिवाशी अशोक शिंदे यांचे वयाच्या ४५ व्यावर्षी गुरुवारी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

### बाळकृष्ण जवळेकर



सुराज्य/वेळापूर: वेळापूर येथील बाळकृष्ण श्रीधर जवळेकर (गुरूजी) वय ८० यांचे शुक्रवार दिनांक ३० सप्टेंबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्यामागे एक मुलगा दोन विवाहित मुली जावई सुना नातवंडे पत्नी असा परिवार आहे. रविंद्र जवळेकर यांचे ते वडील होत.

## भाजीपाल्यांचे दर स्थिर

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शुक्रवार, ७ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार भाजीपाल्यांच्या दर स्थिर राहिले. यामध्ये



ढोवळी मिरची, कारली, कोथिंबीर, काकडी, लसूण, कांदा पात, लिंबू, बटाटा, शेपू, पालक आदींचे दर स्थिर राहिले. तर वांगी, कोबी, फ्लॉवर, हिरवी मिरची आदींचे दर प्रतिक्विंटल १०० ते ५०० रूपयेने वाढले.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ४,००० | ६,५०० | ५,००० |
| कारली | ६०० | २,००० | १,००० |
| वांगी | १,००० | ५,००० | ३,००० |
| कोबी | १,४०० | १,५०० | १,४०० |
| ढोवळी मिरची | ५०० | १,६०० | १,००० |
| गाजर | १,५०० | २,५०० | २,००० |
| गवार | १,००० | ५,००० | ३,००० |
| कोथिंबीर | ६०० | १,१०० | ७०० |
| काकडी | १,००० | ४,००० | २,००० |
| फ्लॉवर | ५६० | २,०८० | १,२०० |
| लसूण | ९०० | २,५०० | १,३०० |
| घेवडा | ६०० | ६०० | ६०० |
| हिरवी मिरची | २,६०० | ३,२०० | ३,००० |
| अंबाडी भाजी | २०० | ४०० | ३०० |
| कांदा पात | ६०० | ८०० | ६०० |
| बटाटा | ७५० | २,१०० | ८५० |
| राजगिरा | १५० | ३०० | २०० |
| लिंबू | १,३०० | ४,००० | २,५०० |
| तांदूळ | ३,०१० | ६,३४० | ३,७९० |
| दोडका | ५०० | २,५०० | १,५०० |
| शेपू | ५०० | ७०० | ५०० |
| पालक | २०० | ५०० | ३०० |
| टोमॅटो | ६०० | २,५०० | १०० |
| गहू | २,२९५ | ३,३०० | २,७६० |

# परिवहनचे मल्लाव यांच्यासह तीन अधिकाऱ्यांना नोटीस

**बस क्यूशेड जाहिरात घोटाळा प्रकरणी आयुक्तांचे आदेश**

**महिन्यात परिवहनच्या १८ लाख नुकसानीची भरपाई न केल्यास फौजदारी**

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमात महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी स्वच्छता मोहीम जोरात राबविली असून बस क्यूशेड जाहिरात घोटाळा प्रकरणी तत्कालीन व्यवस्थापक मल्लाव यांच्यासह तीन अधिकाऱ्यांना एका महिन्यात परिवहनच्या १८ लाख नुकसानीची भरपाई करा अन्यथा फौजदारी कारवाई करण्यात येईल, अशा नोटिसा धाडण्यात आल्या आहेत.**

परिवहन व्यवस्थापक तथा महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी हे आदेश दिले आहेत. अनेक वर्षापासून आर्थिक संकटात असलेल्या महापालिकेच्या परिवहन उपक्रमाला आणखी आर्थिक खड्ड्यात घालण्याचा खळबळ जनक प्रकार महापालिका परिवहन उपक्रमात उघडकीस आला आहे घोळात घोळ आणि गैरकृत्याद्वारे परिवहन उपक्रमाला १८ लाख २४ हजार २४० रुपयांचा नुकसान झाल्याने या नुकसानाला जबाबदार असलेल्या परिवहन उपक्रमाचे तीन अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. त्या तिघाही अधिकाऱ्यांनाही नुकसान भरपाई जमा करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे अन्यथा फौजदारी कारवाई करण्याचे आदेश परिवहन



व्यवस्थापक तथा महापालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांनी काढले आहेत.तसेच मुदतीत नुकसान भरपाईची ही रक्कम प्रशासनाकडे जमा न केल्यास त्यांच्या मिळकतीतून जमा करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेही न झाल्यास त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. यामुळे आता त्यांच्यात धावपळ सुरू झाली आहे. या प्रकरणात दोषी धरण्यात आलेले तत्कालीन आयुक्त अशोक मल्लाव, आणि प्रमुख मुख्य वाहतूक निरीक्षक भारत कंदकुरे हे निवृत्त झाले असून कार्यालयीन अधीक्षक- नि लेखापाल श्रीशैल लिगाडे यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

### यांना बजावल्या नोटिसा !

तत्कालीन व्यवस्थापक अशोक मल्लाव यांच्यासह कार्यालयीन अधीक्षक नि लेखापाल श्रीशैल लिगाडे (बडतर्फ) आणि सेवानिवृत्त झालेले प्रमुख मुख्य वाहतूक निरीक्षक भारत हनुमंत कंदकुरे अशा तिघांकडून या नुकसानाची भरपाई त्यांना विभागून प्रत्येकी ६ लाख ८ हजार ८० रुपये इतके परिवहन उपक्रम प्रशासनाकडे २८ ऑक्टोबरपर्यंत भरावे लागणार आहे. तशा नोटिसा या तिघांनाही बजावण्यात आल्या आहेत.

### काय आहे बस क्यू शेडवरील जाहिरात प्रकरण?

वरील तिघे परिवहन उपक्रमात त्या-त्या पदावर कार्यरत असताना परिवहन उपक्रमातील बसेसच्या आंतरबाह्य जाहिराती तसेच शहरातील बस क्यू शेडवरील जाहिरातीचा मक्ता परिवहन उपक्रमांकडून सन २०१६ मध्ये संपलेला मक्ता त्यामध्ये वाढ करून पुन्हा त्याच मक्तेदाराला ५ वर्षासाठी मुदत वाढवून दिला होता. असे असताना हा मक्ता संपुष्टात येण्यापूर्वीच दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी त्याच मक्तेदाराला त्या पुढील ५ वर्षे सन २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली.


# श्री गणेश वस्त्र दालनात कपडे खरेदीवर चक्क बुलेट गाडी जिंका

▶ प्रत्येक खरेदीवर ५ टक्के रकमेची मोफत खरेदी करा

सुराज्य/बार्शी

**शहरात कापड विक्री व्यवसायात अल्पावधीत प्रसिद्ध झालेल्या श्री गणेश या भव्य कौटुंबिक महावस्त्र दालनात रुपये ४९९९ ची कपडे खरेदी करणाऱ्या ग्राहकांस लकी ड्रॉ द्वारे रॉयल ईनफ्लिड कंपनीची बुलेट गाडी चक्क बक्षीस म्हणून मिळणार आहे. यासोबतच फ्रिज, एलईडी टी.व्ही., होम थिएटर, फॅन, मिक्सर, मोबाईल, हॉट पॉट, वॉटर प्युरिफायर, कुलर आदी वस्तूसह प्रत्येक खरेदीवर ५% रकमेची मोफत खरेदी करता येणार आहे.**



या लकी ड्रॉमध्ये सहभागी होण्यासाठी यासाठी ग्राहकांनी लवकरात लवकर कपडे खरेदी करून या लकी ड्रॉ योजनेत सहभागी व्हावे. तसेच ग्राहकांना होलसेल दरात कपडे खरेदी करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध असल्याचे उद्योजक महेश यादव यांनी सांगितले.

रोडगा रस्ता गणेश रोड विश्वेश्वर बँकेजवळ श्री गणेश हे वस्त्र दालन अलिशान भव्य चार मजली इमारत आहे.

ही लकी ड्रॉ योजना दसरा व दिवाळी या सणानिमित्त आयोजित केली असून बक्षिसांचे मानकरी व्हावे. तसेच यावर्षीपासून श्री गणेश टेलर्स या नवीन दुकानाचे उद्घाटन झाले असून आपल्या मनपसंद अशा आकर्षक शिलाईद्वारे कपडे शिवून दिले जाणार आहेत. तरी या दोन्ही ठिकाणी कपडे खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन उद्योजक महेश यादव,गणेश नान्नजकर, संतोष जाधवर व बाळासाहेब कामटे यांनी केले आहे.


## तीन मोटरसायकलींची चोरी

सुराज्य/सोलापूर : शहरातून तीन मोटरसायकल चोरी झाल्याच्या घटना उघडकीस आल्या आहे. पहिली घटना ही एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रियदर्शनी नगर भाजी मंडी जुना विडी घरकुल येथे दि. ४ ते ५ ऑक्टोंबर दरम्यान मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३.सीडब्लू.९४२२ वरील ठिकाणी पार्क केली होती. त्यावेळी अज्ञात चोरट्याने मोटरसायकल चोरून नेली आहे. याप्रकरणी शेखर देविदास शेरला (वय-३१, रा. प्रियदर्शनी नगर यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक भांगे हे करीत आहेत.

दुसरी घटना ही आकाशवाणी केंद्रा जवळील सौम्या क्लीनिक येथे दि.३ ते ४ ऑक्टोंबर दरम्यान घडली. मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३.बीके.०७२३ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.याप्रकरणी बाळकृष्ण प्रभाकर येले (वय-२८, रा. बाबूराव परळकर नगर, आकाशवाणी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक रुपनर हे करीत आहेत.

तिसरी घटना ही फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अशोक विश्रामगृह येथे दि. ५ ऑक्टोंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३.बीजी.५०३३ वरील ठिकाणी पार्क केली असता, अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने चोरून नेली आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा तपास सहाय्यक फौजदार भुले हे करीत आहे.

## डोळ्यावर नारळ मारून केले जखमी

सुराज्य/सोलापूर : माझे नारळ का फोडले, मी फोडणार होतो असे म्हणत हातातील नारळ मारून एकास दुखापत करून जखमी केल्याची घटना दि. ५ ऑक्टोंबर रोजी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास रूपा भवानी मंदिर परिसरात घडली.याप्रकरणी उद्धव रावसाहेब चौगुले (वय-२१,रा.मड्डी वस्ती,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून बबलू हरिभाऊ जाधव (रा. शांतीनगर, मड्डी वस्ती, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. रूपा भवानी मंदिराची पालखी ही रूपा भवानी मंदिर परिसरात आली असता, तेथील सर्व नारळ दुकानदार हे पालखी समोर नारळ वाहून काहीजण स्वतः पालखी समोर नारळ फोडत होते.त्यावेळी फिर्यादी यांचा लहान भाऊ यशराज रावसाहेब चौगुले (वय-१४) हा देखील पालखीसोबत येत होता.त्यावेळी तेथील दुकानदाराचे नारळ घेऊन फोडत असताना फिर्यादी यांच्या भावास बबलू जाधव हा नारळ फोडणार आहे हे माहित नव्हते.त्यावेळी फिर्यादीचा भाऊ बबलूचे नारळ का फोडले, मी फोडणार होतो, असे म्हणून त्याने त्याच्या हातातील नारळाने यशराजच्या उजव्या डोळ्यावर मारून दुखापत करून जखमी केले आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक भोगशेट्टी हे करीत आहे.

# श्रीमंत मालोजीराजेंच्या उपस्थितीत सीमोल्लंघन कार्यक्रम थाटात

सुराज्य/अक्कलकोट





**अक्कलकोट संस्थांकडून दसरा महोत्सव यावर्षी पुन्हा एकदा उत्साहत साजरा करण्यात आली. जुन्या राजवाड्यात पार पडलेल्या या ऐतिहासिक परंपरेला अक्कलकोटकरांनी प्रतिसाद देत हजारोच्या उपस्थितीत संपन्न झाला. यामुळे अक्कलकोट संस्थांनचा इतिहास पुन्हा एकदा नव्याने जागृत झाला. बुधवारी दिवसभर अक्कलकोट नरेश श्रीमंत मालोजीराजे भोसले यांच्या हस्ते शस्त्रपूजेसह विविध पूजा पार पडल्या.**

यामुळे राजवाडा परिसरात नागरिकांना आंनदाचे वातावरण पाहायला मिळाले.पहाटेपासूनच या महोत्सवाची तयारी सुरू होती. सायंकाळी सीमोल्लंघनाचा कार्यक्रम राजेशाही पद्धतीने पार पडला. याप्रसंगी अक्कलकोट नरेश श्रीमंत मालोजी राजे भोसले यांच्यासह मानकरी, सेवेकरी, हजारो नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित झाले होते.

प्रारंभी जुना राजवाडा येथून सीमोल्लंघन मिरवणूक निघाली. ते फत्तेसिंह चौक,कारंजा चौक, शरणमठ या मार्गावरून शरणमठा समोरील संस्थांनची संगोपित केलेल्या शमी वृक्षतळी श्री गणेश पूजन करण्यात आले. पूजा करून परतत असताना अक्कलकोटच्या मुख्य रस्त्यावरून नागरिक व्यापारी महिला मोठी गर्दी केली होती.दरम्यान अक्कलकोट नरेश श्रीमंत मालोजीराजे यांचे औक्षण करून पुष्पवृष्टी केली.परत येऊन जुन्या राजवाड्यातील देवीचे पूजन व आरती करण्यात आली. यावेळी श्रीमंत मालोजीराजे भोसले यांचे थोरले बंधू सयाजीराजे भोसले व त्यांच्या आईसाहेब जय प्रभादेवी राजे भोसले आणि त्यांचे मामा आशिष कदम तसेच त्यांचे मित्र ॲड शुभम वडणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्याला वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे,जय हिंद शुगरचे चेअरमन गणेश माने देशमुख, माजी सभापती महिबूब मुल्ला यांच्यासह मानकरी मुकुंद घाडगे, महेश शिर्के, विलासराव जाधव, गणेश इंगळे, सागर इंगळे, संभाजी निंबाळकर, अक्षय राजेशिर्के, रोहन राजे शिर्के, महेश काटकर, गणेश काटकर,दिलीप जाधव, उल्हास निंबाळकर, राहुल निंबाळकर, शिवाजी गुजर, सूरज निंबाळकर, तानाजी बावणे, अशोक जगताप,दिगंबर घाटगे आदी उपस्थित होते.

## सोलापुरात 'आनंदाचा नजराणा, मनोरंजनाचा खजिना' कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर : 'आनंदाचा नजराणा, मनोरंजनाचा खजिना' या कार्यक्रमातून सोनी मराठी थेट तुमच्या शहरात भेटीला येणार आहे. विविध मनोरंजनाचे थेट लाईव्ह प्रक्षेपण तुम्हाला या सोनी मराठीच्या व्हॅनवरून पाहता येणार आहे.

येत्या रविवारी आमची ही सोनी मराठीची व्हॅन 'आनंदाचा नजराणा, मनोरंजनाचा खजिना' घेऊन सोलापूर येथील 'सांगोला' या शहरात येणार आहे. तर तुम्ही सगळेच सोनी मराठीच्या या आगळ्या वेगळ्या संकल्पनेला नक्कीच भरभरून प्रतिसाद द्याल यांत शंका नाही. अनेक मालिकांनी प्रेक्षकांच्या मनात घर केले आहे. सोनी मराठी वाहिनी थेट प्रेक्षकांना त्यांच्या शहरात येऊन भेट देणार आहे.

# महिलांनी कुटुंबाइतकीच स्वतःची काळजी घेतली पाहिजे : शितलदेवी

सुराज्य/अकलूज

**गेली अनेक वर्षे शिवरत्न फाऊंडेशन व डॉटर्स फाऊंडेशन महिला व मुलींसाठी उपयुक्त निरनिराळे सांस्कृतिक, क्रीडा, कार्यक्रम राबविते. महिलांनी स्वतः च्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे यासाठी नियमितपणे व्यायाम व चौरस आहार हा जीवनशैलीचा भाग बनवला पाहिजे. महिला कायम कुटुंबासाठी कष्ट करतात अशा जबाबदाऱ्यांमुळे महिलांचे स्वतःकडे दुर्लक्ष होते त्यांनी कुटुंबा इतकीच स्वतःची काळजी घेतली पाहिजे, असे मत शिवरत्न फाऊंडेशन व डॉटर्स मॉम फाऊंडेशन अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.**



शिवरत्न फाऊंडेशन व डॉटर्स मॉम फाऊंडेशन तर्फे २० सप्टेंबर २०२२ ते ४ ऑक्टोबर २०२२ या कालावधीमध्ये दांडिया गरबा प्रशिक्षण व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी त्या बोलत होत्या.

या प्रशिक्षणामध्ये व स्पर्धेमध्ये २०० पेक्षा जास्त महिलांनी व मुलींनी सहभाग नोंदवला होता. प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये प्रशिक्षक वैष्णवी खरटमल यांनी एकूण पंधरा दिवस महिला व मुलींना दांडिया गरबा चे प्रशिक्षण दिले.

शिवरत्न शिक्षण संस्था संचलित विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग मधील विद्यार्थिनी मुस्कान शेख हिची ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स येथे शासकीय अधिकारी म्हणून निवड झाली याबद्दल तिचा शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.नवरात्री मधील अष्टमी दिवशी छोट्या मुलींचे कन्या पूजन करण्यात आले. यामध्ये मुलींना अल्पोपाहार देऊन गरजू मुलींना थंडीसाठी स्वेटर देण्यात आले. मुलींनी शिक्षण घ्यावे त्यांनी शैक्षणिक प्रगती करावी म्हणून डॉटर मॉम फाऊंडेशन कडून सायकली भेट देण्यात येत आहेत.यातूनच सायकल बँक ही संकल्पना उदयास येत आहे.या बक्षीस वितरण कार्यक्रम प्रसंगी प्रशिक्षक सोनम होरा नारायणकर वैष्णवी खरटमल व तांत्रिक सहाय्यक अमोल फुले यांचा सन्मान सौ मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.या स्पर्धेमधील सर्व विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

जाहीर प्रसिध्दीकरण

याद्वारे सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सर्व नांगरिकांना सूचित करण्यात येत आहे की, सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करुन पथविक्रेत्यांची यादी तयार करण्यात आलेली आहे. सदर यादी अंतिम करण्याकरीता सूचना व हरकती १०/१०/२०२२ ते १०/११/२०२२ या कालावधीमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी लेखी अर्जाद्वारे स्वीकारण्यात येणार आहेत. सदरची यादी सर्व नागरिकांना पाहण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान शहर अभियान कक्षामध्ये (प्रशासकीय इमारत तिसरा मजला) पाहण्यास उपलब्ध आहेत. तरी यादीबाबत सूचना व हरकती असल्यास लेखी अर्जाद्वारे कळवावे. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सही/- **आयुक्त तथा अध्यक्ष**
शहर पथविक्रेता समिती, सोलापूर महानगरपालिका सोलापूर

क्रि.कि.अर्ज नं.५५०/२०२२
नि.नं. ५

**जाहीर नोटीस**

**माळशिरस येथील मे.ज्युडि. मॅजी. वर्ग-१ यांचे कोर्टात**

सौ. वर्षा अमोल खरात -अर्जदार
विरुध्द
मुख्याधिकारी, महाळुंग-श्रीपूर नगरपंचायत -सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदाराने या मे. कोर्टात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे यातील अर्जदार सौ. वर्षा अमोल खरात यांनी नगरपंचायत कार्यालय महाळुंग-श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांचेकडेस अर्जदार यांनी त्यांची आई कांताबाई निवृत्ती वाघमारे यांच्या मृत्यूची नोंद दि. ०८/०२/२०२२ अशी धरणेचा हुकुम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसांचे आत आपण आपल्या वकीलांमार्फत अगर स्वतः मे. कोर्टात नेमलेल्या तारखेस म्हणजे दि. ११/११/२०२२ रोजी अगर त्यापुर्वी हजर होवून म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस मे. कोर्ट पुढील योग्य तो हुकुम करतील याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४ माहे १० सन २०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

सही/- **(कनिष्ठ लिपीक)**

सही/- **सहाय्यक अधिक्षक,**
फौजदारी न्यायालय, माळशिरस



## प्रत्येकाने स्वत:च्या आरोग्याची काळजी घ्यावी : मोहिते-पाटील

**अकलूज** : आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाने आपापल्या आरोग्याची वेळच्यावेळी तपासणी करून घेवून स्वत:च्या आरोग्याची काळजी घ्यावी असे मत शिवामृत दूध उत्पादक संघाचे चेअरमन धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केले. विजयनगर अकलूज येथील शिवामृत दूध संघ येथे रोटरी क्लब अकलूज व उपजिल्हा रुग्णालय अकलूज व योगेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड व लिंक वर्कर स्कीम सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवामृत येथे आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी शिवामृत दुध संघा मधील सर्व कामगारांच्या रक्ताच्या विविध वैद्यकिय तपासण्या करण्यात आल्या व यावेळी लिंक वर्कर कमल इंगळे यांनी विविध आजारा विषयी जनजागृतीपर माहिती दिली. याप्रसंगी पुढे बोलताना मोहिते पाटील म्हणाले की,आजचे युग हे धावपळींचे युग आहे.त्यामुळे अनेकजण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात.यासाठी योग्य वेळी तपासण्या करून घेतल्या तर पुढील अनर्थ टळतात.यासाठी वेळेवर तपासणी करून घेत प्रत्येकाने आरोग्याची काळजी घ्यावी.या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष दिपक फडे, कार्यकारी संचालक रविराज इनामदार देशमुख, सेक्रेटरी दिग्विजय माने पाटील, ICTC चे टेक्निशियन सुंदर गायकवाड व लिंक वर्कर कमल इंगळे हे उपस्थित होते.

## वाढदिवसाच्या निमित्ताने खाऊच्या पैशातून शाळेला साउंड सिस्टीम भेट

**विरवडे** : वाढदिवसाचे औचित्य साधून मोहोळ तालुक्यातील कुरुल येथील जि.प. प्राथमिक केंद्र शाळेतील इयत्ता दुसरीतील शिकणाऱ्या विद्यार्थ्याने खाऊच्या पैशातून वर्गाला साऊंड सिस्टिम भेट दिली आहे. या त्याच्या उपक्रमाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. २५ सप्टेंबर रोजी या चिमुकल्याचा अर्थात दुसरीत शिकणाऱ्या संस्कार सुहास घोडके यांचा वाढदिवस असतो. या दिवशी त्याने आमच्या वर्गात आम्हाला पाढे म्हणायला व गाणी आणि कविता शिकायला साऊंड नसल्याचे सांगितले. तेव्हा तू तुझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने शाळेला गिफ्ट दे असे कुटुंबीयांनी सल्ला दिला. त्यावेळी त्याने साठवलेल्या पैशातून वर्गासाठी साऊंड सिस्टिम भेट देण्याचा निश्चय केला आणि त्यानुसार ऑनलाईन ऑर्डर केली. ही ऑर्डर काल दि.५ ऑगस्ट रोजी डिलिव्हरी झाली. आज संस्कार उर्फ मुन्ना याने तो साऊंड प्रार्थनेच्यावेळी वर्गशिक्षिका स्मिता लामतुरे यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी संस्कारच्या उपक्रमाचे कौतुक केले आणि असा आदर्श सर्वांनी घेतला पाहिजे असे सांगितले.

## बागेहळ्ळी गावच्या तंटामुक्त अध्यक्षपदी मनोज शिंदे.

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील बागेहळ्ळी येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज २ ऑक्टोबर गांधी जयंतीनिमित्त विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.अतिशय खेळीमेळीत ग्रामस्थांच्या उपस्थितीत ग्रामसभा संपन्न झाली.याच ग्रामसभेत गाव तंटामुक्त अध्यक्ष म्हणून यंदा पाचव्यांदा पुन्हा एकदा मनोज आनंदराव शिंदे यांची सर्वानुमते फेर निवड करण्यात आली.बागेहळ्ळी गावचे महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी पाचव्यांदा फेर निवड करण्यात आल्याने मनोज आनंदराव शिंदे यांची बागेहळ्ळी ग्रामपंचायत व विविध कार्यकारी सेवा सोसायटी आणि ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सन्मान करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

## पिलीव येथील प्रतीक्षा कोपनर हिला राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आर्यमान शुटींग स्पोर्ट्स क्लब ची विदयार्थ्यांनी प्रतीक्षा परशुराम कोपनर हिने आसनसोल पश्चिम बंगाल येथे सूरु असलेल्या २४व्या आल इंडिया कुमार सुरेंद्रशिंग इंटर स्कुल राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत १० मिटर एअर रायफल प्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करताना रायफल युथ गटामध्ये ४००पैकी ३८७गुण मिळवून कांस्य पदक मिळविले.अशी कामगीरी करणारी ती सोलापूर जिल्हातील पहीलीच खेळाडु आहे. प्रतीक्षा ही पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेज मध्ये शिक्षण घेत आहे. तिला प्रशिक्षक आकाश गुजरे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या हया यशाबद्दल माळशिरस तालुक्याचे लोकप्रिय आमदार रामभाऊ सातपुते, जिल्हा क्रिडा अधिकारी नितीन तारळकर, महाराष्ट्र रायफल असोसिएशनच्या सचिव शिला कानंगो, तालुका क्रिडा अधिकारी सुप्रीया गाढवे, कर्मवीर भाऊराव पाटील व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेज चे प्राचार्य कापसे, अनिल खटावकर, पिलीव पत्रकार संघ यांच्या वतीने प्रतीक्षा हिचे या यशाबद्दल अभिनंदन व कौतुक होत आहे.

सुराज्य सोलापूर
Classified

विवाह विषयक

● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 7387906921
(10922)

पाहिजे

● श्री. तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर येथील कार्यालयात १ स्मार्ट लेडीची आवश्यकता (फोनवर माहिती सांगण्यासाठी) आहे. शिक्षण किमान १२ वी आवश्यक, अपेक्षित पगार दिला जाईल. गरजूंनी संपर्क साधावा.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 8378851719
(211022)

## विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जि प प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर येथील पहीली ते चौथीच्या विदयार्थ्यांना गणवेशाचे शाळा व्यवस्थापन समीती अध्यक्ष संजय पाटील, उपाध्यक्ष रुपाली मदने, शिक्षणतज्ञ प्रियंका मदने,सदस्य स्वाती गारुळे,पल्लवी मदने, ग्रामपंचायत सदस्या स्वाती मदने, शहाजी मदने, शशिकांत घडयाळे, नाथा पवार, विजय मदने, सागर गोंजारी, सुनील गावडे, मुख्याध्यापक सुहास कोल्हे, सहशिक्षक सुनील इुरे यांच्या उपस्थित गणवेशाचे वाटप करण्यात आले.

# दुधनीजवळच्या खराब रस्त्यामुळे शेतीमाल वाहतुकीचे दर वाढले

### रेल रोको,रास्ता रोको करणार : सिध्दाराम म्हेत्रे

सुराज्य/सोलापूर

**अक्कलकोट आणि गाणगापूर या दोन तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या महामार्गाला दुधनीजवळ तर संगोळगी-बिंजगेर गावाजवळील चढणपर्यंत रस्त्यावर मोठे-मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे या महामार्गाची मोठी दुरवस्था झाली आहे. खड्यामुळे रस्त्याला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. वाहन चालकाना खड्ड्यांचा अंदाज समजत नसल्याने जमिनीला आदळून अनेक अपघात होत आहेत. विशेष म्हणजे दुधनी रेल्वे गेट होणे गरजेचे बनले आहे. तासनतास वाहने याठिकाणी थांबल्याने वेळ व इंधनाचा अवाजवी खर्च होत आहे.**

दुधनी येथे मार्केट कमिटी असल्याने दररोज याठिकाणी तालुक्यासह शेजारील जिल्ह्यातुन शेतीमालाची मोठ्या प्रमाणावर आवक होत असते.या खचलेल्या रस्त्यामुळे दळणवळणावर खुप मोठा परिणाम होत आहे.तसेच अक्कलकोटहून गाणगापूर येथील दत्त महाराजांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भक्ताना मोठी कसरत करावी लागत आहे.याठिकाणी वारंवार अपघात होत असल्याने वाहनधारकांमध्ये दुधनीच्या रस्त्याची भिती निर्माण झाली आहे.

यावर्षी दुधनी शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने रस्त्यावरील मुरूम कडेला जावून रस्ते निसरडे बनले आहे. यामुळे संबधित विभागाने या मार्गावरील सर्व खड्डे त्वरित बुजवून स्वामी भक्तांसह प्रवाशांना दिलासा द्यावी अशी मागणी होत आहे.



दुधनीजवळील रस्ता अत्यंत खराब झाला आहे. रस्त्याच्या दुरावस्थेबाबत संबधित विभागाला अनेकदा पाठपुरावा केला आहे. तसेच ठेकेदारास कल्पना देण्यासंदर्भात कार्यवाही केली आहे. योगायोगाने जास्तीच्या पावसाने रस्त्याची अक्षरश: चाळणी झाली आहे. रस्त्याची दुरूस्ती हाती घेतली नाही तर हजारोंच्या संख्येने रेल रोको व रास्ता रोको करणार आहे. - सिध्दाराम म्हेत्रे

### जास्तीचे भाडे...

दुधनीजवळील रस्त्याची मोठी दुरावस्था झाली आहे. या रस्त्यावरची वाहतुक म्हणजे जणू सर्कसचा खेळच बनला आहे. ही भीषण परिस्थिती शेतकऱ्यांना सांगत ओळखुन शेतीमाल नेण्यासाठी वाहनधारक दुधनीच्या वाहतुकीसाठी जास्तीचे पैसे घेत आहेत. नाईलाजास्तव शेतकऱ्यांना आर्थिक बुर्दंड सोसावा लागत आहे.




# भंडारकवठ्याच्या बिराजदारने पटकावली कामती केसरी

### भंडारकवठेला पहिल्यांदाच मिळाला केसरीचा मान

**दक्षिण सोलापूर** : कामती येथे आयोजित केलेल्या कै.पै. विठोबा शहाजी दुधाळ-पाटील यांच्या स्मरणार्थ कामती केसरी २०२२ कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील लक्ष्मीकांत राजशेखर बिराजदार यांनी कामती केसरीचा मान पटकावला.

कामती येथे आयोजित केलेल्या कुस्ती ही मॅंटवर आयोजीत केली.८० कीलो वजनी गटात भंडारकवठे येथील हनुमान आखाड्यातील हणमंत पुजारी यांचा पठ्ठा पै.लक्ष्मीकांत राजशेखर बिराजदार यांनी कामती येथील पै. शिवराज शेंडगे यांना चितपट करत कामती केसरीचा किताब पटकावला या पुरस्कारात चांदीची गदा कामती केसरीचा किताब व सहा हजार रोख सह बक्षीस देण्यात आले ही स्पर्धा गेली बारा वर्षांपासून कामती येथे आयोजित करण्यात येत आहे.



या कामती केसरीसाठी कामती परिसरातील बहुसंख्य कुस्तीपटू सोलापूर जिल्ह्यातुन मोठ्या संख्येने उपस्थित होते.भंडारकवठे गावाला प्रथमच मान पै.लक्ष्मीकांत बिराजदार यांनी कामती चषक जिंकल्याने भंडारकवठे येथील भंडारकवठे ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी बाजार समिती संचालक वसंत पाटील माजी पंचायत समिती सदस्य विठ्ठल पाटील सरपंच चिदानंद कोटगोंडे हणमंत पुजारी, धोंडप्पा कमळे' मदगोंडा बिराजदार, श्रीमंत कुंभार, मलकारी पुजारी, रवी कदम, वैजनाथ भरले, शिवलिंग कारभारी, अशोक शिरवळ, नागनाथ चिंचोळी, श्रीशैल बबलेश्वर आदी मान्यवर उपस्थित होते.

## मोडनिंबच्या अरुण सुर्वे यांची राज्य कार्याध्यक्षपदी निवड

सुराज्य/मोडनिंब

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत जिल्हा परिषद नगर परिषद कामगार युनियनची सभा राज्याध्यक्ष मोहन लामकानी सोलापूर जिल्हा मार्गदर्शक गुरुबा भोसले यांच्या अध्यक्षतेखाली मोहोळ येथे लोकनेते बाबुराव आण्णा पाटील सभागृहात पार पडली.

यावेळी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी प्रश्न मागण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा सुरू असून दहा टक्के नोकर भरती, दहा टक्के सेवा जोडणी किमान वेतनाचा मागील फरक ६१ कलम वेतनश्रेणी यावलकर समितीचा अहवाल सेवानिवृत्त झालेल्या कामगारांना आर्थिक लाभ मिळावायाबाबत प्रदेश सरचिटणीस दिलीप जाधव यांनी सभेत कर्मचाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. निवडीचे पत्र राज्याध्यक्ष मोहन लामकाने प्रदेश सरचिटणीस दिलीप जाधव यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी गोरोबा भोसले बालाजी पवार भगवान कांबळे पांडुरंग खरात बंडू चंदनशिवे संतोष गायकवाड दादा निमगिरे अर्जुन पालखे सूर्यकांत डिडवळ संतोष शेंबडे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## पिलीवच्या तीन खेळाडुंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आर्यमान शुटींग स्पोर्ट्स क्लब च्या तुषार सचीन वाघमारे, अर्थव नितीन राजमाने व अर्जुन महेश राजमाने यांनी महाराष्ट्र रायफल अशोसिएशन वरळी येथे आयोजित केलेल्या ७व्या पश्चिम विभागीय वेस्ट झोन ९० मिटर एअर पिस्तूल स्पर्धेत उतक्रुष्ट प्रदर्शन करीत तिरुवनंतपुरम (केरळ)येथे आक्टोंबर महीन्यामध्ये होणाऱ्या ३९व्या आल इंडिया मावळणकर स्पर्धेकरीता हे खेळाडु पात्र झाले. या सर्व खेळाडुंना प्रशिक्षक आकाश गुजरे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विदयार्थ्यांनचे कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयाचे मुख्याध्यापक कापसे, तसेच पिलीव परीसरातील राजकिय, सामाजिक, शैक्षणीक क्षेत्रातील मान्यवर व पिलीव पत्रकार संघ यांच्या कडुन अभिनंदन व कौतुक होत आहे



## जयहिंद परिवाराच्या सत्काराने भारावलो; नूतन पालकमंत्री विखे-पाटलांचा सत्कार

**अक्कलकोट** : सोलापूर जिल्ह्यात जयहिंद परिवाराची घौडदौड ही यशस्वी अन् आदर्शवत ठरली आहे. मी जयहिंद परिवारामधलाच घटक आहे. आज या परिवाराचा सत्कार स्वीकारताना विलक्षण असा आनंद होत आहे. सोलापूर जिल्ह्याच्या औद्योगिक क्षेत्रात जयहिंद परिवाराने मिळविलेली लोकप्रियता वाखाणण्याजोगी असल्याचे गौरवोद्गार राज्याचे महसूल मंत्री तथा नूतन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.

सोलापूर जिल्ह्याच्या नूतन पालकमंत्रीपदी राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची निवड झाल्याबद्दल जय हिंद परिवाराच्यावतीने सोलापूर येथील जय हिंद हाउसमधील हॉटेल शनायाच्या प्रांगणात कौटुंबिक सत्कार सोहळा पार पडला. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार सुभाष देशमुख,भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान अवताडे, जयहिंद परिवाराचे संस्थापक भास्करराव माने देशमुख, चेअरमन गणेश माने देशमुख, तज्ञ मार्गदर्शक बब्रुवान माने देशमुख, शालिवाहन माने देशमुख, माढा येथील सहकार महर्षी गणपतराव साठे सेवाभाव प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप साठे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना विखे पाटील म्हणाले की,एकेकाळी सोलापूर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जायचा. परंतु आज पश्चिम महाराष्ट्रात सर्वच बाबतीत हा जिल्हा आघाडीवर असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच जयहिंद परिवाराने सामाजिक उपक्रमासोबतच औद्योगिक क्षेत्रात गरुडझेप घेतल्याचे गौरवोद्गार काढले. जयहिंद शुगरच्यावतीने नूतन पालकमंत्र्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेअरमन गणेश माने देशमुख यांनी केले.यावेळी बोलताना ते म्हणाले की, आपण पालकमंत्री म्हणून सोलापूरचा पदभार स्वीकारला आहात,याचा आम्हाला आनंद आहे.नूतन मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतरही कोणत्याही परिस्थितीत आमच्या जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी ही आपल्याकडेच असावी, असा मानस त्यांनी व्यक्त केला.

यावेळी व्हा.चेअरमन विक्रमसिंह पाटील, विजय पाटील, मोहन चिंतलकर, सचिन चव्हाण, रवीप्रकाश मेंगर, आर. गोकूळ, आचेगावचे सरपंच रमेश क्षीरसागर, मनगुळीचे संजय गायकवाड, विलास लोकरे, बाबासाहेब निंबाळकर यांच्यासह जयहिंद परिवारातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुती बावडे यांनी केले.

## महाळुंग येथे लंपीने गायींचा मृत्यू

सुराज्य/श्रीपूर

महाळुंग तालुका माळशिरस येथे लंपी आजाराने एका देशी गाईचा शुक्रवार रोजी मृत्यू झाला आहे या देशी गायवर गेली १३ दिवसा पासून त्या गाईला ताप येणे, पायला सुज येणे शरीरावर गाठी येणे या लक्षणामुळे गाय एका जागी बसुन होती, औषध उपचार सुरू होते पण आज रोजी देशी गाईचा मृत्यू झाला असल्याची माहीती महाळुंग पशुचकीत्वक अधिकारी डॉ. विक्रम दीक्षित यांनी माहिती दिली.

ते पुढे म्हणाले की लंपी रोगाची पाच महिन्याची कालवड व एक वर्षाची कालवड या दोन देशी गाईंना लंपी रोगाची लागण झाली असून त्यापैकी एका वर्षाचे कालवड गाई उपचारातून अंशत: बरे झाले आहे. तर सहा महिन्याच्या कालवडावर तीन दिवसापासून उपचार सुरू करण्यात आले आहेत असे सांगून ते पुढे म्हणाले की महाळुंग, मिरे, माळीनगर येथील शेतकऱ्यांनी जनावरांमध्ये लंपी रोगाबाबत लक्षणे आढळल्यास तात्काळ महाळुंग पक्षूचकित्सक दवाखाना येथे डॉ. विक्रम दीक्षित यांच्याकडे संपर्क साधावा असे आव्हान त्यांनी केले. लंपी रोगाने मृत्यू पडलेल्या देशी गाईची महाळुंग घटनास्थळी जिल्हा पशुवैद्यकीय सोलापूर अधिकारी डॉक्टर भास्कर पराडे तसेच पशुवैद्यकीय चकीत्सक डॉ. प्रमोद बाबर यांनी भेट देऊन लंपी रोगामुळे मृत्यू झालेल्या जनावराची माहिती घेतली.




# अक्कलकोट तालुक्यात सोयाबीन पिकावर यलो मोझॅकचा प्रादुर्भाव

### पीकविमा योजनेतून अग्रिम स्वरुपात सोयाबीन उत्पादकांना २५ टक्के रक्कम जोखीम म्हणून देण्याची मागणी

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांचा सोयाबीन पिकाकडे कल वाढला आहे. अक्कलकोट तालुक्यात त्याची लागवड मोठ्या प्रमाणावर झाली असून, यलो मोझॅक या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे.

यामुळे सोयाबीन उत्पादक संकटात सापडले आहेत. अशाच परिस्थितीत उस्मानाबाद जिल्हाधिकाऱ्यांनी पीकविमा कंपनीस सोयाबीन पिकाच्या जोखमेपोटी २५ टक्के रक्कम अग्रिम स्वरूपात वितरित करण्यासंदर्भात आदेश दिले आहेत. त्याच धर्तीवर अक्कलकोट तालुक्यासह जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक भरपाईची मागणी करीत आहेत. आधीच यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यातच भर म्हणून सोयाबीनवर यलो मोझॅकचा प्रादुर्भाव झाला असून, पाने पिवळी पडली आहेत.कृषी विभागाने यासंदर्भात शेतकऱ्यांना खबरदारीचे आवाहन केले आहे. प्रामुख्याने यलो मोझॅक हा रोग सोयाबीनच्या पिकातील विषाणूग्रस्त झाडापासून पांढरी माशीच्या माध्यमातून प्रसार होतो. झाडाच्या पानावर तांबूस करपट रंगाचे ठिपके दिसतात. यामुळे पाने अरुंद व वेडीवाकडी होऊन आकार लहान होतो. संपूर्ण पानामधील हरितद्रव्यांचा रास होऊन फळधारणा कमी होते. यामुळे उत्पन्नात मोठी घट होत आहे.सोयाबीनवरील यलो मोझॅक रोगाने शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढवली आहे. म्हणून अडचणीतील शेतकऱ्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पीकविमाधारकांना अग्रिमस्वरूपात मदत मिळण्यासाठी आदेश देण्यासंदर्भात कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकर्यामधून होत आहे.अक्कलकोट तालुक्यात कृषी विभागाकडील माहितीनुसार यावर्षी ३३४० हेक्टरवर सोयाबीन लागवड झाली आहे.यलो मोझॅकमुळे उत्पन्नात मोठी घट होणार आहे. दसरा, दिवाळीचा सण पार पाडण्यासाठी शेतकयांना आर्थिक कसरत होणार आहे. म्हणून उस्मानाबादच्या धर्तीवर पीकविमा योजनेतून अग्रिम स्वरुपात सोयाबीन उत्पादकांना २५ टक्के रक्कम जोखीम म्हणून देण्याची मागणी तालुक्यातील शेतकर्यातून होत आहे.



यलो मोझॅकचा रोगप्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. यावर उपाय म्हणून थायमिथोक्झाम १२.६० टक्के, लॉबडा सायहॅलोथ्रोन ९.५० टक्के झेड ही २.५ मिली प्रतिदहा लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
**- रोहित थोरात कृषी सहायक, हालहळ्ळी (अ)**

# एनसीबीची मोठी कारवाई!

# १२० कोटींचे ६० किलो ड्रग्ज जप्त

- अंमलीपदार्थ नियत्रण विभागाची कामगिरी
- मुंबई व गुजरातमधून मिळून एकूण सहा जणांना पकडण्यात यश

सुराज्य/नवी दिल्ली

**अंमली पदार्थाच्या गोदामावर कारवाई करून ५० किलो मेफेड्रोन (एमडी) जप्त करण्यात अंमलीपदार्थ नियत्रण विभागाला (एनसीबी) यश आले आहे. याप्रकरणी गुजरातमधूनही १० किलो एमडी जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या एमडीची किंमत १२० कोटी रुपये आहे. याप्रकरणी दोघांना मुंबईतून अटक करण्यात एनसीबीला यश आले आहे.**

एनसीबीने याप्रकरणी माजी वैमानिक सोहेल गफ्फार याच्यासह दोघांना अटक केली आहे. दुसऱ्या आरोपीचे नाव मुथ्थू असून त्याला यापूर्वीही अटक करण्यात आली आहे. हे दोघेही केरळ आणि गुजरातमधील रहिवासी असून जप्त केलेले अंमली पदार्थ फोर्टमधील कबुतरखाना परिसरातील गोदामात सापडले.


याप्रकरणी गुजरात तेथील जाम नगर येथेही कारवाई करून १० किलो एमडी जप्त करण्यात आले. या टोळीने गेल्या दोन वर्षात २५० किलो एमडीची विक्री केल्याचा संशय आहे. याशिवाय मुंबई व गुजरातमधून मिळून एकूण सहा जणांना पकडण्यात आले आहे.



## ‘आदिपुरूष’ च्या वादात विश्व हिंदू परिषदेची उडी

सुराज्य/नवी दिल्ली

**प्रभास आणि सैफ अली खान यांची मुख्य भूमिका असलेला आदिपुरूष हा चित्रपट प्रदर्शनाआधीच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या चित्रपटात प्रभू रामचंद्र तसेच रावणाच्या पात्रावर आक्षेप नोंदवण्यात आला आहे. हा चित्रपट महाराष्ट्रात प्रदर्शित होऊ देणार नाही, अशी भूमिका भाजपाचे नेते राम कदम यांनी घेतली आहे. तर आमचा या चित्रपटाला पाठिंबा असेल, अशी भूमिका मनसेने घेतली आहे. असे असताना दिग्दर्शक ओम राऊत यांनी याबाबतची आपली भूमिका स्पष्ट करावी, असा पवित्रा विश्व हिंदू परिषदेने घेतला आहे. विश्व हिंदू परिषदेचे प्रवक्ते श्रीराज नायर यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे.**



विश्व हिंदू परिषदेची स्थापना मुंबईतच झालेली आहे. या ६० वर्षांत विश्व हिंदू परिषदेने चित्रपट, जाहिराती यावर कधीही टिप्पणी केलेली नाही. मात्र मागील काही काळापासून चित्रपट क्षेत्रातील एका वर्गाकडून हिंदू देवदेवतांवर टीका तसेच हिंदू आचार-विचार, साधू यांची खिल्ली उडवली जात आहे. आदिपुरूष चित्रपट अद्याप प्रदर्शित झालेला नाही. या चित्रपटाचा फक्त टीझर आलेला आहे. मात्र या चित्रपटाचा टीझर पाहून अनेक लोकांनी आक्षेप व्यक्त केला आहे. हे टीझर पाहून आमच्याही मनात काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखकांनी लोकांच्या भावनेशी खेळू नये. त्यांनी तत्काळ आपली भूमिका जाहीर करायला हवी. सध्या सुरू असलेल्या वादावर दिग्दर्शक ओम राऊत यांनी स्पष्टीकरण द्यायला हवं, अशी आमची मागणी आहे, असे श्रीराज नायर यांनी सांगितले.

याआधी चित्रपटांमध्ये काही दुरुस्त्या सुचवायच्या असतील तर त्या विश्व हिंदू परिषदेने अत्यंत प्रेमळपणे सुचवलेल्या आहेत. या चित्रपटात भगवान श्रीराम यांच्या पात्रावर वाद आहे. व्हिएफएक्स तसेच तंत्रज्ञानाच्या नावाखाली पौराणिक कथांचे महत्त्व कमी केले जाऊ शकत नाही, अशीही भूमिका विश्व हिंदू परिषदेने घेतली आहे.




## पुण्यात सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव रंगणार

**पुणे** : अभिजात संगीताच्या क्षेत्रात जगभरात नावाजलेला सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव १४ ते १८ डिसेंबर या कालावधीत मुकुंदनगर येथील शेठ दगडूराम कटारिया प्रशालेच्या मैदानावर होणार आहे. आर्य संगीत प्रसारक मंडळातर्फे आयोजित करण्यात येणारा यंदाचा ६८ वा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव आहे.

कोरोना प्रादुर्भावामुळे गेली दोन वर्षे हा महोत्सव होऊ शकला नाही. त्यामुळे यंदाच्या महोत्सवात स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी यांची जन्मशताब्दी साजरी करण्यात येणार आहे, अशी माहिती आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी शुक्रवारी दिली.

## क्षुल्लक कारणावरुन ग्रामपंचायत सदस्याला संपवले



**बीड** : बीडच्या अंबाजोगाई शहरालगत असलेल्या चनई ग्रामपंचायत सदस्याचा रेशन दुकानदारासोबत वाद झाला. या वादाची कुरापत काढून दसऱ्याच्या सायंकाळी त्या ग्रामपंचायत सदस्याची तीक्ष्ण हत्याराने भोसकून हत्या करण्यात आली. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात १७ जणांवर ट्रॉसिटीसह हत्येचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्यात यावी. या मागणीसाठी संतप्त महिलांनी शहर ठाण्याबाहेर ठिय्या मांडला. अखेर अप्पर अधीक्षकांच्या आश्वासनानंतर महिलांनी हे ठिय्या आंदोलन मागे घेतलं. अंबाजोगाई शहरालगतचा चेन्नई हे गाव नेहमीच चर्चेत राहणार असल्याचे नेहमी पाहायला मिळतं. मात्र, रेशन दुकानदारासोबत झालेल्या या घटनेनंतर जवळपास गाव हे भीतीच्या वातावरणामध्ये आणि तणावामध्ये होतं. मात्र, त्यानंतर या घटनेमध्ये जे आरोपी आहेत त्यांना अटक करण्यासाठी पोलीस प्रशासन संत गतीने काम करत असल्याचं गावकऱ्यांना लक्षात आले.

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी बनवलं खास यंत्र

**सांगली** : सांगलीतल्या एका मॅकेनिकल इंजिनिअर तरूणानं शेतकऱ्यांसाठी एक यंत्र विकसीत केलं आहे. जे सध्या ट्रक्चरलाही टफफाईट देतंय. या यंत्राचा सर्वात जास्त फायदा होतोय तो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना. महाराष्ट्रात ऊसाचे क्षेत्र वाढत चाललं आहे. पण ऊसाची शेती करत असताना शेतकऱ्यांना ऊसाचा पाल काढणं खूपच जिकिरीचं ठरतं. पाला काढण्यासाठी शेतकऱ्यांना मजुर मिळत नाही शिवाय पैसाही खर्च करावा लागतो, वेळही जातो... त्यावरच हे यंत्र एक उत्तम पर्याय आहे.

## दसऱ्याला ८५ हजार जणांनी केला मेट्रोने प्रवास

**नागपूर** : दसरा आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या दिवशी मेट्रोतून ८३ हजार ८७६ हजार नागरिकांनी प्रवास केला. यापूर्वी २१ सप्टेंबरला भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया क्रिकेट सामन्याच्या दिवशी प्रवासी संख्या ८०,७९४ पर्यंत गेली होती. १५ ऑगस्टला ही संख्या ९०,७५८ होती. दसऱ्याला प्रवाशांची गर्दी बघता रात्री ११ वाजेपर्यंत मेट्रो सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. एरवी रात्री १० पर्यंत ती धावते. कस्तूरचंद पार्कवर पारंपरिक रावण दहनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तो पाहण्यासाठी अनेकांनी तेथे जाण्यासाठी मेट्रोची निवड केली. कस्तुरचंद पार्क, बर्डी स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी उसळली होती. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महामेट्रोकडून कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती.

## इडली विक्रेत्याकडून पाच लाखांच्या बनावट नोटा जप्त

सुराज्य/नाशिक

**इडलीचा व्यवसाय करणाऱ्या परप्रांतीय व्यक्तीकडून पाच लाख आठ हजार रुपये किंमतीच्या बनावट नोटा आणि ३३०० रुपयांची रोकड पोलिसांनी जप्त केली. संशयित बनावट नोटा विक्री करीत असल्याचा संशय आहे. मलायारसन मदसमय (३३, मूळ कायथर पन्नीकार कुलूम तुदूकुडी, तामिळनाडू) असे या संशयिताचे नाव आहे. भारतनगर भागात त्याला पकडण्यात आले.**

त्याच्याकडे ५०० रुपयांच्या ४० बनावट नोटा आणि दोन हजार रुपयांच्या २४४ बनावट नोटा आढळल्या.

या नोटा विक्री करण्यासाठी संशयिताने बाळगल्या होत्या. बनावट भारतीय चलनी नोटा तयार करणे, त्या खऱ्या असल्याचे भासवून वापरणे व बाळगल्या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## राम मंदिराचे ५० टक्के काम पूर्ण : योगी आदित्यनाथ

सुराज्य/अयोध्या

**अयोध्येतील राम मंदिराचे काम ५० टक्के पूर्ण झाले आहे, अशी माहिती उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिली आहे. तर मंदिर ट्रस्टच्या म्हणण्यानुसार, २०२४मध्ये मकर संक्रांतीच्या दिवशी भगवान श्रीरामाची मूर्ती मंदिराच्या गर्भगृहात ठेवली जाण्याची शक्यता आहे. याशिवाय २०२० मध्ये सुरू झालेले मंदिराचे काम २०२४च्या शेवटापर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. पावनधाम श्री पंचखंड पीठाच्या कार्यक्रमासाठी योगी आदित्यनाथ जयपूर येथे आले होते, यावेळी त्यांनी राम मंदिराच्या कामाबाबत माहिती दिली.**



यावेळी योगी म्हणाले श्रीराम जन्मभूमी आंदोलन १९४९ पासून सुरू झाले. १९८३ मध्ये रामजन्मभूमी समिती स्थापन झाल्यानंतर आंदोलन पुढे सरकले. संपूर्ण देशभरात या आंदोलनाला विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वात संत, महतांनी धार दिली. खूपजण म्हणायचे की काही फायदा होणार नाही. मात्र, आम्ही तर भगवान श्रीकृष्णाने सांगितलेल्या **‘कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन’** या उपदेशावर विश्वास ठेवतो. संतांनी आपल्या आंदोलनाद्वारे हे सिद्ध केलय आणि परिणाम तर दिसरणारच होता.

याशिवाय श्री पंचखंड पीठाने देशाच्या कल्याणासाठी विविध चळवळींमध्ये जनतेचा सहभाग वाढवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली, असेही योगींनी यावेळी बोलून दाखवले.

## पीकविमा, अतिवृष्टीची मदत मिळण्यास अडथळे?

सुराज्य/पुणे

**राज्याच्या मुख्य सचिवांनी आदेश दिल्यानंतरही खरीप हंगामातील पीक कापणी प्रयोग करण्यास तलाठ्यांनी नकार दिला आहे. तलाठ्यांनी दिलेल्या नकाराचा परिणाम म्हणून पीकविमा योजना आणि अतिवृष्टीत झालेल्या नुकसान भरपाईचा लाभ मिळण्यात अडचणी येणार आहेत. राज्यातील तलाठ्यांच्या या आडमुठ्या भूमिकेचा नाहक त्रास शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे.**


राज्यात मंडलनिहाय खरीप हंगामातील पिकाचे पीक कापणी प्रयोग केले जातात. या पीक कापणी प्रयोगातून आलेल्या निष्कर्षानुसार शेतीमालाच्या उत्पन्नांचा अंदाज वर्तविला जातो. अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तीत पिकांचे किती नुकसान झाले, याची माहिती पीक कापणी प्रयोगातून मिळते. पीकविम्याचा लाभ देताना कंपन्या किंवा अतिवृष्टी बाधितांना मदत देताना सरकारकडून पीक कापणी प्रयोगाचे निष्कर्षाचा आधार घेतला जातो. त्यामुळे हे पीक कापणी प्रयोग वेळेत न झाल्यास आणि त्याचे निष्कर्ष संबंधित यंत्रणांना वेळेत न मिळाल्यास शेतकऱ्यांना मदत देण्याच्या प्रक्रियेत अडचणी येणार आहेत.

## गांजाचा वापर केल्यास कारवाई होणार नाही : जो बायडन यांचा फतवा

सुराज्य/अमेरिका

**जगभरातील काही देशात गांज्याच्या विक्रीबाबत कठोर कायदे करण्यात आले आहेत. अमेरिकेतही गांजाचा वापर केल्यास थेट कारागृहात रवानगी केली जात होती. मात्र, आता अमेरिका सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. गांजाचा वापर करताना दोषी ठरवण्यात आलेल्या हजारो नागरिकांना निर्दोष ठरवण्यात आले आहे. त्यांची लवकरच कारागृहातून सुटका करण्यात येणार आहे, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी गुरुवारी सांगितले.**

राष्ट्राध्यक्ष जो बायडेन म्हणाले, ‘गांजाची विक्री आणि त्याचा वापर केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आलेले नागरिक कारागृहात आहेत. त्यांना माफी देण्यात आली आहे. यापुढे कोणालाही गांजा जवळ ठेवल्यास अथवा वापर केल्यास, त्याची रवानगी कारागृहात



होणार नाही. मात्र, लहान मुलांनी गांज्याची तस्करी आणि विक्री करण्यावर मर्यादा कायम ठेवण्यात आल्या आहेत, असेही जो बायडेन यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अमेरिकेत गांज्याबाबात १९७० कायदा तयार करण्यात आला होता. त्यानुसार हजारो नागरिकांवर कारवाई करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १९९२ ते २०२१ पर्यंत ६,५०० लोकांवर कारवाई करत, त्यांना दोषी ठरवले होते. ज्यांना आता जो बायडेन यांनी माफी दिली आहे. त्यांची लवकरच कारागृहातून सुटका होणार आहे.

## पीएफआयचा न्यायाधीश, पोलिसांविरोधात कट

सुराज्य/अयोध्या


**देशातील काही न्यायाधीश, पोलीस अधिकाऱ्यांविरोधात घातपात करण्याचा कट पीएफआयच्या कार्यकर्त्यांकडून आखण्यात येत असल्याची माहिती दहशतवाद प्रतिबंधक विभागाकडून मंगळवारी औरंगाबाद जिल्हा न्यायालयापुढे सादर करण्यात आली.**

मात्र, ज्यांच्याविरोधात कट आखण्यात येत होता ते न्यायाधीश व पोलीस अधिकारी नेमके कोण आहेत, याची माहिती मिळू शकली नाही. एटीएसकडून एक बंद लिफाफाही न्यायालयापुढे सादर करण्यात आला. पीएफआयच्या पकडलेल्या कार्यकर्त्यांकडून दहा मोबाइल फोन, एक हार्डडिस्क, लॅपटॉप यांचा डाटा औरंगाबाद येथील एका




दुकानातून नष्ट करण्यात आला आहे. या दुकानाचा शोध सुरू आहे. संपुष्टात आलेली माहिती पुन्हा मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू असून बुधवारी यासंदर्भातील अधिक माहिती हाती येणार असल्याचेही एटीएसच्या वतीने न्यायालयात सांगण्यात आले.

## ३०० वर्षे जुनी असलेल्या श्रीकृष्णाची मूर्ती चोरीला



जालना जिल्ह्यातील जांब येथील पुरातन श्रीरामाची मूर्ती चोरी गेल्याची घटना ताजी असताना औरंगाबाद जिल्ह्यातील श्री क्षेत्र शेंदूरवादा येथील मध्वनाथ महाराज मठातील समाधी समोरील दिव्य स्वरूप श्रीकृष्णाची पाषाणाची मूर्ती अज्ञात चोरट्यांनी पळविल्याची घटना समोर आली आहे.

या प्रकरणी अधिक माहिती अशी की, गंगापूर तालुक्यात श्रीक्षेत्र शेंदूरवादा येथे मध्वनाथ महाराज यांचं मठ आहे. अशी अख्यायिका आहे की, या ठिकाणी मध्वनाथ महाराज यांनी ३०० वर्षांपूर्वी राधा कृष्ण यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली होती. याच मठातून सुमारे ३५ वर्षांपूर्वी राधेची मूर्ती चोरीला गेली होती. मात्र त्या राधेच्या मूर्तीच देखील अजून शोध लागलेला नाही.

# भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा शाही दसरा

सुराज्य/कोल्हापूर

**श्री करवीर निवासिनी अंबाबाई आणि तुळजाभवानीच्या पालखीच्या उपस्थितीत आणि देशातील प्रमुख सोहळ्यांपैकी एक आणि म्हैसूर नंतर सर्वात मोठा असा करवीरनगरीचा पारंपरिक शाही दसरा सोहळा गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास मोठ्या उत्साहात आणि हजारोंच्या उपस्थितीत साजरा झाला.**

### सीमोल्लंघन

ऐतिहासिक दसरा चौक येथे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते शमीपूजन करून सीमोल्लंघन करण्यात आले. यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील , पद्मश्री डी. वाय. पाटील यांच्यासह अनेक प्रमुख मान्यवरांनी या सोहळ्याला उपस्थिती लावली होती. यंदा पहिल्यांदाच या महोत्सवामध्ये शासनाचा सहभाग असल्याने शाही लवाजम्यासह हा शाही दसरा पार पडला.

### शाही दसरा सोहळा

छत्रपतींची राजधानी असणाऱ्या करवीर नगरीत पारंपरिक विजयादशमीचा शाही दसरा सोहळा ऐतिहासिक दसरा चौकात दिमाखात साजरा झाला.

दसरा सोहळ्यामध्ये श्री शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते शमीपूजन झाले. यानंतर छत्रपतींच्या कुटुंबातील युवराज संभाजीराजे छत्रपती, मालोजीराजे छत्रपती, शहाजीराजे छत्रपती, यशराजराजे छत्रपती व यशस्विनीराजे छत्रपती यांनी सोने लुटताच करवीरवासियांनी अपूर्व उत्साहात सीमोल्लंघन करुन सोने लुटले.

### दसरा चौकाचा परिसर

आनंद, उत्साह आणि परंपरेचा बाज जपत दसऱ्याचा सोहळा पार पडला. दसरा चौकात झालेल्या या सोहळ्यास करवीरवासीयांनी उपस्थिती लावून या परंपरेशी आपला पिढ्यान्पिढ्याचा असलेला संबंध अधिक दृढ केला. या वेळी चैतन्यदायी गर्दीने दसरा चौकाचा परिसर फुलून गेला. हा सोहळा पाहण्यासाठी सायंकाळी पाच वाजल्यापासूनच लोकांनी गर्दी केली होती.

### मेबॅक मोटार

तत्पूर्वी करवीर निवासिनी अंबाबाई (श्री महालक्ष्मी), जुन्या राजवाड्यातील तुळजाभवानी आणि गुरु महाराज यांच्या पालख्यांचे लवाजम्यासह आगमन झाले. यानंतर श्रीशाहू महाराज छत्रपती व कुंटुंबातील सदस्यांचे परंपरागत पध्दतीने ऐतिहासिक मेबॅक मोटारीतून दसरा चौकात आगमन झाले. यावेळी पोलीस विभाग व टी.ए. बटालियनच्या बँड पथकाने करवीर संस्थानचे गीत वाजवून त्यांचे स्वागत केले.

### शाही लवाजम्यात भव्य मिरवणुक

यंदा कोल्हापूरच्या शाही दसरा सोहळ्यात राज्य शासनाने ही सहभाग घेतल्याने शासनाच्या वतीने जोरदार तयारी करण्यात आली होती. छत्रपती घराण्याची मिरवणूक ही शाही पद्धतीने



निघावी यासाठी शासनाने नियोजन केले होते आणि यानुसारच रॅलीत सजवलेले उंट, मावळ्यांच्या वेशभूषेतील घोडेस्वार, शिवकालीन युद्धकलांची व मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके, इतिहासाच्या स्मृती जागवणारे पोवाडे, पारंपरिक पद्धतीने निघालेल्या देवीच्या पालख्या अशा शाही लवाजम्यात निघालेल्या मिरवणुकीने उपस्थित नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

### शहरात एलईडी स्क्रीन

मिरवणुकीत सामाजिक संदेश देणारे चित्ररथ तसेच तालमींचे कुस्तीगीर सहभागी झाले होते. तर रस्त्याच्या दुतर्फा एनसीसीचे विद्यार्थी उभे होते. तसेच नागरिकांना शाही दसरा महोत्सव सोहळा पाहता यावा यासाठी शहरात विविध ठिकाणी एलईडी स्क्रीन लावण्यात आल्या होत्या.










## आई राजा...उदे...उदे...

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तुळजभवानीचे दर्शन घेण्यासाठी चिमुकली मुले, तरुण, दिव्यांग, वयोवृद्ध भाविक पायी निघाले असून वाहतुकीसाठी सोलापूर-तुळजापूर हा रस्ता बंद ठेवण्यात आला आहे.

# मालमत्तेची रक्कम पूर्ण भरल्यावरच शाळा पालिकेकडे हस्तांतर होणार?

### प्रशासकांना हस्तांतरणाचा अधिकारच नाही; माजी जि.प.सदस्यांचे मत

सुराज्य/सोलापूर



जिल्हा परिषदेच्या स्थावर मालमत्तेविषयी गेल्या अनेक वर्षापासून महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी होत आहे. मात्र जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मालमत्तेची रक्कम पूर्ण भरल्याशिवाय महापालिकेकडे हस्तांतर करण्यात येणार नसल्याचा एकमताने निर्णय झाला होता. त्यामुळे जिल्हा परिषदेचे मालमत्ता महापालिकेकडे हस्तांतर करण्यात येणार नसल्याचे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्यांमधून बोलले जात आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महापालिका हद्दीतील जिल्हा परिषदेच्या शाळा पालिकेकडे हस्तांतर करण्याचा सूचना केल्या आहेत. मुळात प्रशासकांना हे अधिकारच नाहीत, अशी माहिती समोर आली आहे. या बैठकीत आमदार सुभाष देशमुख यांनी १९९२ पासून हद्दवाढ झाली तेव्हा जिल्हा परिषदेच्या ज्या शाळा महानगरपालिका हद्दीत आल्या आहेत त्या शाळा महापालिकेकडे वर्ग कराव्यात, अनेक वेळा हा विषय झाला मात्र यावर ठोस निर्णय झाला नाही. असा मुद्दा उपस्थित केला होता यावेळी समोरच बसलेले आमदार संजयमामा शिंदे यांनी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचा ठराव हा नकारात्मक आहे शाळा हस्तांतर करता येत नाहीत, असे सांगितले. परंतु पालकमंत्री विखे पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक दिलीप स्वामी यांना तुम्ही प्रशासक आहेत शाळा हस्तांतर करा अशा सूचना केल्या आहेत. आमदार संजय शिंदे हे आमदार असताना जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत शाळा हस्तांतर करता येणार नाहीत असा ठराव झाला होता. त्यामुळे येणाऱ्या भविष्य भविष्यकाळात जिल्हा परिषद आणि महापालिका यांच्यात मालमत्तेविषयी खडा जंगी होण्याच शक्यता दिसत आहे.

### ६ कोटी भरा आणि हस्तांतर करा : हसापुरे



माजी जि.प. सदस्य सुरेश हसापुरे यांनी याबाबत बोलताना सांगितले की, आपण सदस्य असताना जिल्हा परिषदेचा सेस वाढविण्यासाठी प्रयत्न केल. ज्या शाळा महापालिकेच्या हद्दीत गेल्या आहेत. ती जिल्हा परिषदेची स्थावर मालमत्ता आहे. त्यावेळी त्या सर्व शाळांच्या जमिनीची किंमत ६ कोटी काढली होती, ती रक्कम महापालिकेने झेडपीला द्यावी आणि शाळा आपल्या ताब्यात घ्याव्यात. पण महापालिकेने रक्कम दिली नाही. त्यामुळे झेडपीच्या मालकीच्या स्थावर मालमत्ता हस्तांतर करण्याचा अधिकार प्रशासनाला नाही.

# उद्यापासून मंगळवेढ्यात रंगणार युवा महोत्सव

### 'आर्ची'ची पारितोषिक वितरणास उपस्थिती

**सोलापूर** : सोलापूर विद्यापीठाचा अठरावा युवा महोत्सव दलित मित्र कदम गुरुजी सायन्स महाविद्यालय, मंगळवेढा येथे होणार आहे. रविवारी, ९ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडणार आहे, तर सैराट फेम 'आर्ची' उर्फ रिंकू राजगुरू यांच्या हस्ते युवा महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत शुक्रवारी दिली.

युवा महोत्सवाचे उद्‌घाटन सोहळा रविवारी सकाळी १० वाजता आमदार समाधान आवताडे, आमदार शहाजीबापू पाटील आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. रविवारी सायंकाळी सहा वाजता एकांकिका रंगमंचाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या हस्ते होईल. सुमारे ७५ महाविद्यालये आणि जवळपास २ हजार विद्यार्थी, कलाकारांचा यामध्ये सहभाग राहणार आहे. ९ ऑक्टोबर रोजी नोंदणी, उद्घाटन सोहळा, संघ व्यवस्थापनकांची बैठक, मूकनाट्य, समूहगीत, कातरकाम, प्रश्नमंजुषा लेखी, मराठी-हिंदीइंग्रजी वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन, भितीचित्रण, रांगोळी आणि एकांकिकेचे सादरीकरण होणार आहे.



१० ऑक्टोबर रोजी शास्त्रीय नृत्य, सुगम गायन, पथनाट्य, स्थळचित्रण, वादविवाद, फोक आर्केस्ट्रा, शास्त्रीय सुरवाद्य, कथाकथन, मिमिक्री, स्पॉट फोटोग्राफी, एकांकिका (मराठी, हिंदी) आदी स्पर्धा पार पडतील. ११ रोजी प्रश्नमंजुषा तोंडी, निर्मिती चित्र, शास्त्रीय गायन, व्यंगचित्रण, लघुनाटिका, शास्त्रीय तालवाद्य, मातीकाम आणि लोकनृत्याच्या स्पर्धा रंगतील. १२ रोजी शोभायात्रा पार पडल्यानंतर सकाळी ११ वाजता पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. रिंकू राजगुरू (आर्ची) हिच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक दिली जाणार आहेत.


या पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. राजेश गादेवार, कुलसचिव योगिनी घारे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ कळवणे, पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, जनसंपर्क अधिकारी राहुल वंजारे आदी उपस्थित होते.

# 'दत्तामामांच्या प्रेमाखातर बैठकीला; पक्षप्रवेशाचा निर्णय अद्याप नाही'

- माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांचे स्पष्टीकरण

सुराज्य/सोलापूर

माजी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांच्या उपस्थितीने अनेकांच्या भुवया उंचावल्या. मात्र आपण दत्तामामा भरणे यांच्या प्रेमाखातर बैठकीला आलो, तसा माझा पक्ष प्रवेशा बाबतीत अद्याप कोणताच निर्णय झाला नाही. कार्यकर्त्यांशी चर्चा करून पक्ष प्रवेशाबाबत निर्णय घेण्यात येईल, असे चंदनशिवे यांनी सांगितले. चंदनशिवे यांच्या या वक्तव्याने त्यांच्या प्रवेशाचा सपेन्स आणखी वाढला आहे.



वास्तविक चंदनशिवे हे राष्ट्रवादीत प्रवेश करणार होते. मात्र सत्तांतरासह विविध कारणामुळे त्यांचा प्रवेश लांबत चालला आहे. त्यामुळे ते कधी राष्ट्रवादीत जाणार याची उत्सुकता लागली आहे. दरम्यान, शुक्रवारी शासकीय विश्रामगृह येथे सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीला बसपाचे माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांची उपस्थिती दिसली. त्यामुळे उपस्थितांच्या भुवया उंचावल्या. चंदनशिवे हे पक्षाच्या कोणत्याच बैठकीला उपस्थित नव्हते ते कसे चंदनशिवे यांनी पक्षात प्रवेश निश्चित झाला का असा सवाल उपस्थित करताच माजी पालकमंत्री आमदार दत्तात्रय भरणे यांनी, आनंद घ्या आनंद द्या असे म्हणत चंदनशिवे हे आमच्यात पक्षात आहेत असे सांगितले.



मात्र चंदनशिवे यांनी मी मामाच्या प्रेमा खातर आलो, पक्षाच्या बैठकीला बसा म्हणून खुर्ची दिली म्हणून बैठकीला बसलो. भरणे मामा जेव्हा कधी बोलावतील, आपण तेव्हा निश्चित जाऊ. मात्र सध्या पक्ष प्रवेशाची कोणतीही प्रकिया झाली नाही. कार्यकर्त्यांचा विचार घेऊन आपण पुढील निर्णय घेऊ, असे सांगितले.

# जि.प.च्या टेंडर चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नेमली समिती

- पालकमंत्र्यांच्या आदेशाची अंललबजावणी;
- पंधरा दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश

सुराज्य/सोलापूर

जिल्हा नियोजन समितीच्या सभेत आमदारानी जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील टेंडरच्या गडबडीबाबत प्रश्न उपस्थित केल्यावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी चौकशी समिती गठीत केली आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांच्या अखत्यारीतझालेल्या जल जीवन मिशन योजनेतील निविदा प्रक्रीयेची चौकशी करण्याकरींता समिती गठीत करणेबाबत जिल्हाधिकारी शंभरकर यांनी हे आदेश काढले आहेत. झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील पालकमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकित केलेल्या ठरावानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यकारी अभियंता दिपक कोळी यांच्या अखत्यारीत झालेल्या जल जीवन मिशन योजनेतील निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याकरिता खालीलप्रमाणे चौकशी समिती गठित करण्यात येत आहे. चौकशी समितीचे अध्यक्ष सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता संजय माळी हे अध्यक्ष असतील तर मृद व जलसंधारण कार्यकारी अभियंत अ. प. कदम, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सदाशीव शेळके हे सदस्य तर स्थानिक निधीचे लेखाधिकारी सरताज शेख हे सदस्य सचिव असतील, असे आदेश काढले आहेत.

### हे मागितले स्पष्टीकरण

चौकशी समितीने १५ दिवसाच्या आत सदर प्रकरणाची प्रत्यक्ष तपासणी करून परीपूर्ण अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा. निष्पक्षपातीपणे अहवाल तयार करावा. चौकशी समितीने आवश्यक त्या ठिकाणी अधिकारी, कर्मचारी यांना चौकशीसाठी उपस्थित राहण्यासाठी सांगितल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. चौकशी समितीला आवश्यक ते सहकार्य मिळेल याची खातरजमा करण्याची जबाबदारी विभागप्रमुखाची राहील. सादर दस्तावेज, पुरावे यांच्याआधारे अंतिम निष्कर्ष काढून आपला स्पष्ट अभिप्राय अहवाल तयार करून सादर करावा, असे जिल्हाधिकारी शंभरकर यांनी काढलेल्या आदेशात नमूद केले आहे.

# 'गोदूताई'मधील कामात कसूर केली जाणार नाही : जिल्हाधिकारी

**सोलापूर** : कुंभारी येथील गोदूताई परुळेकर नगर मधील अंतर्गत रस्ते सुधारणा ग्रामीण मार्ग क्रं १९ विजय नगर ते गोदूताई क्रांती चौक व ग्रामीण मार्ग क्रं १८ क्रांती चौक ते साखर कारखाना दरम्यान रस्त्यांसाठी निधीची तरतूद करून कामाचे आदेश पारित झाले आहे.

या रस्त्यांचे काम चांगले, गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे, नियोजित वेळेत काम पूर्ण करावे तसेच कोणतीही समस्या अथवा तक्रार येता कामा नये अशा शब्दांत संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना रस्त्याच्या कामाचा शुभारंभावेळी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी आदेश दिले. कुंभारी येथे कॉ.गोदूताई परुळेकर नगर मधील मुख्य रस्ते ग्रामीण मार्ग १८ व १९ रस्त्याच्या कामाचा शुभारंभ कार्यक्रम संस्थेचे संस्थापक मुख्य प्रवर्तक तथा माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांच्या अध्यक्षतेखाली व मा.जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय भाषणात नरसय्या आडम मास्तर म्हणाले की, नागरिकांचे अथक परिश्रम व संस्थेच्या पाठपुराव्यामुळे आज या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली असून या कामी जिल्हा प्रशासन, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर तसेच संबंधित अधिकारी आदींनी सहकार्य केले. यावेळी संस्थेचे प्रभारी युसूफ शेख यांनी प्रास्ताविक केले. सिटूचे राज्य महासचिव अॅड.एम.एच.शेख, पोलीस अधीक्षक तेजस्विनी सातपुते यांनी शुभेच्छा संदेश दिले. यावेळी व्यासपीठावर अतिरिक्त मुख्य कार्य अधिकारी संतोष धोत्रे,कार्यकारी अभियंता सुनिल कटकधोंड, उप कार्यकारी अभियंता खैरादी, अभियंता नकांबळे, कुंभारीचे सरपंच श्रुती निकंबे, कुंभारीचे उपसरपंच सुरज पाटील, वळसंग पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक अतुल भोसले नगरसेविका कामिनी आडम, मीनाक्षी साने चे चेअरमन सौ सुनंदा बल्ला आदी उपस्थित होते.



प्रथम पुण्यस्मरण



कै.श्रीमती कस्तुराबाई लक्ष्मण वागदुरगी

मृत्यू दि. ०८/१०/२०२१

लाभेल का अशी मूर्ती,
आदर्शाची होती किर्ती,
पुनर्जन्म घ्यावा आमच्यासाठी,
वाहतो आम्ही सर्व मिळूनी,
प्रेमाची व श्रद्धेची पुष्पांजली!

शोकाकुल
वागदुरगी आणि निडगुंदी परिवार

# ऑटोरिक्षातून वाहतूक होणारी ४०० लिटर हातभट्टी दारु जप्त

**सोलापूर** : राज्य उत्पादन शुल्क विभागाने राबवलेल्या विशेष मोहिमेत ७ ऑक्टोबर रोजी सोलापूर शहरात एका ऑटोरिक्षातून ४०० लिटर व मोटरसायकलीवरुन १६० लिटर हातभट्टी दारुची वाहतूक करताना पकडली.

दि.७ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने सिद्धार्थ चौक येथे पाळत ठेवत एका ऑटोरिक्षा क्रमांक एम.एच.१३.जी.७७३४ मधून ४०० लिटर हातभट्टी दारु जप्त केली असून संशयित आरोपी इसम जितेश देवसिंग तारवाले (वय-३६,रा.उत्तर सदर बाजार) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्याच्या ताब्यातून २० हजार ४००रुपये किंमतीच्या हातभट्टी दारुसह एकूण १ लाख ४०० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.एका अन्य कारवाईत सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास निलम नगर येथील लक्ष्मीनारायण टॉकिज समोरील रोडवर एका दुचाकींवरून हातभट्टी दारूची वाहतूक होताना आढळून आल्याने राजू बाबू चव्हाण (वय-४१, रा.मुळेगाव तांडा,ता.दक्षिण सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला असून एम.एच.१३ डीपी.२१०६ या दुचाकीसह १६० लिटर हातभट्टी दारू जप्त केली असून,एकूण ७८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# निवडणुकांसाठी मनसे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे : अमित ठाकरे

### सोलापूर शहराला दिली धावती भेट

सुराज्य/सोलापूर

आगामी काळात सोलापुरात महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका होत आहेत. मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी या निवडणुका लढण्यासाठी आणि जिंकण्यासाठी सज्ज रहावे. सोलापूरवर राज ठाकरे यांचेही विशेष लक्ष असणार आहे, त्यामुळे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागावे, असे प्रतिपादन असे मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी केले.



अमित ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मनसेचे महा संपर्कअभियान अभियान सुरू आहे. गणेशोत्सव आणि नवरात्रनंतर मराठवाड्यातून या अभियानाच्या टप्पा सुरू होत आहे. त्यासाठी तुळजापूर येथे जाण्यासाठी अमित ठाकरे सोलापुरात गुरुवारी रात्री आले होते. त्यावेळी त्यांचे स्वागत मनसेचे शाडो मंत्री दिलीप धोत्रे यांनी केले. शुक्रवारी सकाळी त्यांनी सोन्या मारुती येथील मनसेच्या जिल्हा कार्यालयाला भेट दिली आणि गणपतीची आरती झाल्यानंतर पत्रकारांशी वार्तालाप साधताना ते म्हणाले की, आपला विद्यार्थी बांधणीसाठी चा दौरा आहे. सध्या मराठवाड्यात आपण तरुण-तरुणींना भेटणार आहेत ज्यांना विद्यार्थी सेनेत काम करण्याची इच्छा आहे अशांशी संपर्क साधणार आहे.

आगामी काळात मनसेचा युवा वर्गावरच जास्त भर असणार आहे राज ठाकरे यांचे शहरावर विशेष लक्ष असणार आहे. आगामी काळात महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांचा सोलापूर दौराही होणार आहे. यावेळी मनसेचे शाडो मंत्री दिलीप धोत्रे, जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, शहर अध्यक्ष जैनुदिन शेख विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष अमर कुलकर्णी, प्रशांत इंगळे व पदाधिकारी उपस्थित होते.

### कोणताच मेळावा पाहिला नाही

शिवसेनेच्या इतिहासात यंदा पहिल्यांदाच दोन दसरा मेळावे झाले. शिवाजी पार्कच्या मैदानावर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा, तर बीकेसीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दसरा मेळावा झाला, यावर अमित ठाकरेंना प्रश्न विचारला असता मेळावे झालेत का, मी पाहिले नाही, असे म्हणून राजकीय विषयावर बोलणे टाळले.